किंमत - वार्षिक वर्गणी १००/- रुपये

# अर्थबोधपत्रिका

आपल्या आजूबाजूस घडणाऱ्या विविध घटनांचा
'अर्थ'बोध करून देणारे मासिक

INDIAN SCHOOL OF POLITICAL ECONOMY
9/4/07

३ ● मूल्यसाधना
५ ● प्रवास मूल्यांचा....
१२ ● मूल्य जपानी 'मा'चे
१७ ● कलेतून 'अर्था'नंद
२० ● 'बाहेर'च्यांची 'कॉन्ट्रिब्यूशन'....
२७ ● जागतिकीकरण आणि चलनवाढ
३६ ● जिकडे-तिकडे (मैत्री पर्यावरणाशी)
३८ ● सिंहावलोकन

खंड ६ : अंक १ एप्रिल २००७

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**वार्षिक वर्गणी १००/- रुपये**

**(परदेशस्थ वाचकांसाठी $२०)**

वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/ पोस्टल ऑर्डर/चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

**'अर्थबोधपत्रिका' दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.**


**वर्गणीसाठी पत्ता :**

**व्यवस्थापक, अर्थबोधपत्रिका,**

**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध, ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, (रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.

फोन : २५६५७१३२, २५६५७२१०

फॅक्स : २५६५७६९७

ई-मेल: ispe@vsnl.net, ispe@vsnl.com


---


**अर्थबोधपत्रिका**

**खंड ६ (अंक १) एप्रिल २००७**

**संपादक - अभय टिळक**

**साहाय्यक संपादक - राज्यश्री क्षीरसागर**


### *'अर्थबोधपत्रिके'तील माहिती कशी?*

- उद्बोधक, वाचनीय आणि रंजक
- अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- नि:पक्ष व साधार
- सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक
- हाताशी असणाऱ्या मोजक्याच वेळात जगाबद्दलचे भान वाढविणारी

### *'अर्थबोधपत्रिके'चा हेतू*

प्रतिष्ठित व अग्रगण्य नियतकालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यतः इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी वेचक माहिती संदर्भासह पुरविणे.

### *'अर्थबोधपत्रिका'कशी साकारते?*

- मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन
- निवडक साहित्याचे संकलन
- संकलित साहित्याला अन्य पूरक माहितीची जोड
- संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.

---

◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.

◆अंकातील लेख आपण नियतकालिकात/वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे. **यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे. - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी.

# मूल्यसाधना

मानवी जीवन हे मूल्यवान आहे, असे आपण नेहमीच म्हणतो. परंतु, हे म्हणत असतानाच एक बाब आपल्याला दर वेळी प्रकर्षाने जाणवतेच असे नाही. मानवी जीवन हे केवळ मूल्यवानच नाही तर ते मूल्यांकितही आहे, ही ती बाब. मूल्यांच्या एका अत्यंत विशाल आणि तितक्याच गुंतागुंतीच्या व्यवस्थेने आपले व्यक्तिगत तसेच सामाजिक जीवन व्यापलेले असते. मानवी मूल्यव्यवस्था आणि मानवी समाजव्यवहार यांचे नाते हे दुपेडी असते. म्हणजेच, आपली मूल्यव्यवस्था ज्याप्रमाणे आपल्या व्यवहारांचा पोत ठरवत असते त्याचप्रमाणे समाजव्यवहारांतील गतिमानताही मूल्यव्यवस्थेवर आपला प्रभाव टाकत असते. अर्थात, यांतील कोणती प्रक्रिया प्रथम घडते या प्रश्नाचे उत्तर 'कोंबडे आधी की अंडे आधी ?' या प्रश्नाच्या उत्तराच्या पंगतीत बसवावे लागेल. विशेषतः, एखाद्या समाजाची मूल्यव्यवस्था, मूल्यपरंपरा आणि त्या समाजाचा आर्थिक-भौतिक अभ्युदय व विकास यांच्या परस्परसंबंधाची चर्चा करताना या दुपेडी नात्याचा शोध कसोशीने घ्यावा लागतो. यासाठी फार दूर जाण्याचीही गरज नाही. आपल्याच देशाचे उदाहरण अभ्यासण्याजोगे आहे. नैसर्गिक साधनसामग्रीचे वैपुल्य, उद्यमशीलता आणि वाणिज्यव्यवहारांची प्राचीन परंपरा, ज्ञानसाधनेची पुरातन संस्कृती इतक्या साऱ्या पूरक बाबी गाठीशी असूनही भारतीय अर्थव्यवस्था तिच्या अंगभूत क्षमतांचा आजवर पुरेपूर लाभ का उठवू शकली नाही, या प्रश्नाचा ऊहापोह अनेक विद्वानांनी नानाविध अंगांनी केला आहे. जन्मजात अधिकारभेदावर आधारलेली श्रेणीबद्ध समाजरचना पुरस्कृत करणारी वर्णाश्रमप्रधान मूल्यप्रणाली भारतीय समाजात प्रदीर्घ काळ नांदल्यामुळे अंगभूत गुणकौशल्यांवर निर्भर अशा श्रमविभागणीच्या तत्वाला कुंपणे पडली आणि त्यापायी एकंदरच बाजारपेठीय व्यवस्थेची कुचंबणा होऊन स्पर्धेला वावच न राहिल्याने भारतीय अर्थव्यवस्था कुंठित बनली, असे प्रमेय, अनेक अभ्यासक-संशोधकांनी या संदर्भात मांडले आहे. या मूल्यव्यवस्थेला ब्रिटिश अमदानीत तडे गेले, व्यक्तीच्या जन्मजात अधिकारापेक्षा

(पृष्ठ ३८वर पाहावे)

# वाचकांचा प्रतिसाद

'अर्थबोधपत्रिके'च्या फेब्रुवारी २००७च्या अंकातील 'वित्तीय चित्र राज्यांचे' या अंतर्गत भारतातील विविध राज्यांच्या आर्थिक स्थितीचा आढावा घेण्यात आला आहे. त्यावरून राज्यांची आर्थिक परिस्थिती बिकट आहे, असे दिसते. हे वाचून मनात काही प्रश्न निर्माण झाले. हे असेच चालू राहिले तर भारताला आर्थिक संकटाला सामोरे जावे लागेल का ? या निराशाजनक चित्राची आशादायक बाजू आहे का ? त्या दिशेने जाण्याचे प्रयत्न चालू आहेत का ?.... या पैलूंवरही आपण प्रकाश टाकावा, असे वाटते. 'सीएसआर'कडून 'सीएसआय'कडे जाणाऱ्या कंपन्यांची उदाहरणे देता आल्यास ती द्यावी. टाटांसारख्या उद्योगसमूहाला पश्चिम बंगालमध्ये एवढा विरोध का होतो ? तेथे 'सीएसआर' कसे उपयुक्त ठरेल ?... यांसारख्या मुद्यांबाबत काही ऊहापोह करता आल्यास तेही उपयुक्त ठरेल.

चीनमध्ये ख्रिस्ती धर्म वाढतो आहे. तेथील राजकारण व धर्म याबाबत आपण माहिती पुरविलीत. त्याप्रमाणे भारतात धर्म व राजकारणविषयक परिस्थिती काय आहे, तेही मांडता आल्यास पाहावे. 'धर्म' म्हणजे 'कर्तव्य' अशी सांगड भारतात पूर्वापार घालण्यात आली आहे. त्याचा कर्मकांडाशी संबंध नव्हता. पण अलीकडे भारतात वाढणारे कर्मकांड पाहता आपण 'धर्म' म्हणजे 'कर्तव्य' या कल्पनेपासून दूर जात आहोत असे दिसते. **मोहन मार्डीकर, नागपूर**

'अर्थबोधपत्रिके'चे अंक वाचनीय असतात. फेब्रुवारी २००७मधील 'स्मार्ट डस्ट'बाबतचा लेख आवडला. 'पत्रिके'तील विविध विषयांवरील माहितीचा मला उपयोग झाला आहे. माझी मुलगी या वर्षी १२वीच्या परीक्षेला बसली असून विज्ञान-तंत्रज्ञानविषयक निबंध लिहिताना तिला 'स्मार्ट डस्ट'सारख्या लेखांची मदत झाली आहे. मात्र अशी माहिती परीक्षकांच्या वाचनात आली असेल का, असा प्रश्न पडतो.

**जी. आर. जोग. भरणे, ता-खेड, जि-रत्नागिरी**

'अर्थबोधपत्रिके'चा मी वर्गणीदार आहे. आपल्या अंकांचा उपयोग महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी यांना होईल असे वाटते. त्यामुळे माझ्या संग्रहातील अंक मी कुडाळ येथील एका महाविद्यालयाला दिले आहेत.

**डॉ. मधुकर. त्रिं. घारपुरे, सावंतवाडी**

# प्रवास मूल्यांचा....

'द बेस्ट वे टू प्रिडिक्ट द फ्युचर इज टू क्रिएट इट' असे म्हणतात. याला अनुसरून आपले भविष्य घडविण्यासाठी उत्सुक असलेले समाजगट वर्तमानातच योग्य विचार व कृती करीत जातात. ही कृतिशीलता अंगी बाणविण्यासाठी त्यांना पाठबळ मिळते ते मूल्यांचे. व्यक्तिगत तसेच समाजजीवन समृद्ध व्हावे, मानवी व्यवहारांची वाटचाल आदर्शांकडे व्हावी आणि अशी मार्गक्रमणा करणाऱ्या संस्कृतींचे संवर्धन व्हावे यासाठी असणारी महत्त्वाची तत्त्वे म्हणजे मूल्ये (Values). ही मूल्ये बाजारपेठेत विकत मिळत नाहीत. ती मनामनांत निर्माण व्हावी लागतात, घट्ट रुजावी लागतात, मगच व्यक्तिगत व समाजजीवनात त्यांचा वृक्ष होतो.

समाजजीवन हे खळाळत्या प्रवाहाप्रमाणे गतिशील असते. त्यात काळानुरुप बदल होणे अपेक्षित असते, अनेकदा तसे बदल होतही जातात. या बदलांना सामावून घेण्यासाठी जीवनव्यवहारांत लवचिकता असावी लागते. मग बदलाच्या प्रक्रियेत काही मूल्ये प्रवाहाबाहेर टाकली जातात, तर काही नवी मूल्ये प्रवाहात सामावून घेतली जातात. पात्रातील खडकांमुळे कधीकधी प्रवाहाची गती अवरुद्ध होते तेव्हा प्रवाहाचा नाद वाढतो. मग कधी खडकांवरून उसळी घेऊन तर कधी खडकाला वळसा घालून प्रवाह पुढे सरकतो. असे अडथळे ओलांडणे हेच प्रवाहाचे वैशिष्ट्य. प्रगतीशील समाजजीवनाचेही हेच वैशिष्ट्य असावे लागते.

अलीकडे, 'समाजातील मूल्ये ढासळत आहेत', 'मूल्यशिक्षण हे शालेय वयापासून मिळायला हवे', अशी विधाने आपल्या कानांवर वरचेवर पडतात. पण या विधानांच्या खोलात जाण्याचे ठरविले तर समाजजीवनात मूल्यांचा प्रवेश कसा झाला, कोणती मूल्ये समाजांकडून स्वीकारली गेली वा त्यांचा त्याग करण्यात आला, मूल्यांचा सामाजिक व आर्थिक विकासाशी कसकसा संबंध आहे, मूल्यांच्या आधारावर कोणते देश वा समाजगट बदलले आहेत, बदलत आहेत, असे अनेकानेक प्रश्न उपस्थित होतात. देशादेशांमधील सामाजिक व आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन मूल्यांबाबतचे नवनवे अभ्यास आता आंतरराष्ट्रीय पातळीवर करण्यात येऊ लागले आहेत. तसेच मूल्यांचा प्रवास भविष्यात कसकसा होऊ शकतो, याबाबत अंदाज

मांडण्यात येत आहेत. अमेरिकेतील मिशिगन विद्यापीठातील प्राध्यापक रोनाल्ड इंगेलहार्ट हे मूल्यांचा सखोल अभ्यास करीत आहेत. मूल्यांच्या अभ्यासावर 'व्हॅल्यू चेंज ऑन सिक्स कॉन्टिनेन्ट्स्', 'मॉडर्नायझेशन अँड पोस्टमॉडर्नायझेशन : कल्चरल, इकॉनॉमिक अँड पोलिटिकल चेंज इन फोर्टी थ्री सोसायटीज्', 'ह्यूमन व्हॅल्यूज अँड बिलीफ्स', 'रायझिंग टाइडः कल्चरल इक्वालिटी अँड कल्चरल चेंज अराउंड द वर्ल्ड', 'मॉडर्नायझेशन, कल्चरल चेंज अँड डेमोक्रसी' अशी अनेक पुस्तके १९९०नंतर प्रसिद्ध झाली आहेत. या नव्या अभ्यासांकडे जाण्याआधी मूल्यांचा इतिहास थोडक्यात जाणून घेणे योग्य ठरेल.

## आर्थिक मूल्ये ते जीवनमूल्ये

मूल्यांविषयी सामान्य विचार जरी जुन्या काळात आणि पौर्वात्य व पाश्चात्य देशांमध्ये होत आला असला, तरी मूल्यमीमांसेचा पद्धतशीरपणे विचार व स्वतंत्रपणे उगम एकोणिसाव्या शतकातील नीतिशास्त्रीय विचारसरणीमधून झालेला आहे. 'मूल्य' या शब्दाचा मूळचा अर्थ 'आर्थिक मूल्य' हा होता. पण जर्मन तत्त्वचिंतकांनी त्याला व्यापक अर्थ दिला. त्या अर्थाने जीवनमूल्ये, वाङ्‌मयीनमूल्ये, लोकशाहीमूल्ये अशा प्रकारचे शब्दप्रयोग केले जाऊ लागले. भारतात प्राचीन काळापासून नीतिशास्त्र अस्तित्वात असून मूल्ये व कर्माकर्मविवेक सांगणारे ते वर्तनशास्त्र ठरते. अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, अशा अनेक शास्त्रांशी नीतीचा घनिष्ठ संबंध असल्याने नीतीचा विचार व्यापक होतो. त्यामुळे भारतीय मूल्यविचारात 'मूल्य' या शब्दाला केवळ आर्थिक परिमाण प्राचीन काळापासून नसले तरी एकूण मूल्यविषयक विचारविश्वात आर्थिक मूल्याचा विचार प्रारंभापासून अनुस्यूत होता.

एखाददुसऱ्या व्यक्तीच्या अनुकूल वा प्रतिकूल वृत्तीमुळे मूल्ये ठरत नाहीत तर, सबंध समाजाच्या प्रतिक्रियेने ती ठरतात, असेच साधारणपणे मानले गेले व जाते. म्हणजे, 'समाजधारणेसाठी योग्य असणारी तत्त्वे' ती 'मूल्ये' होय. ही मूल्ये परंपरेने, संस्कृतींद्वारे मानवसमूहाला मिळतात (यात धर्मही आला), असे म्हणता येते. मात्र, माणसांच्या विचारप्रक्रियेद्वारे, सामूहिक चिंतनाद्वारे ही मूल्ये बदलत्या समाजजीवनानुसार स्वीकारली जातात वा टाकून दिली जातात. केवळ इतकेच नाही तर, बदलत्या समाजजीवनाशी सुसंगत अशी नवीन मूल्यप्रणाली काळाच्या ओघात साकारते आणि हळूहळू ती व्यक्तिगत तसेच सामूहिक जीवनक्रमाचा भाग बनून जाते. असे बदल इतर अनेक समाजांमध्ये होत असतानाही काही मोजक्या मानवसमूहांत

मात्र ते घडून आलेले दिसले नाहीत, तर त्या समाजजीवनांचा प्रवाह खंडित झाला, असे मानता येईल. 'मूल्य' या शब्दासाठी असलेला Value हा इंग्रजी शब्द Valeo या लॅटिन शब्दावरून आला आहे. त्याचा मूळ अर्थ 'शक्ती', 'आरोग्य' असा असून नंतर 'ज्यामुळे परिणाम घडतो', असा अर्थही त्याला प्राप्त झाला. फ्रेंच भाषेतील Valeur या शब्दाचा अर्थ 'उत्तमपणा' असा होतो. पाश्चात्य तत्त्वज्ञानात मूल्यवादी विचारसरणीचा उगम प्लेटोपासून (ख्रिस्तपूर्व ४२८ ते ३४८) होतो. मात्र, भारतात मूल्यमीमांसेचे स्वतंत्र शास्त्र नसण्याचे प्रमुख कारण म्हणजे भारतातील समग्र तत्त्वज्ञानाचा मध्यवर्ती दृष्टिकोणच मुळी मूल्यात्मक आहे. संस्कृतमध्ये 'जे मूलात आहे' त्याच्याशीच 'मूल्य' शब्दाचा संबंध आहे. याचा अर्थ असा होतो की 'सृष्टीची मूळ रचनाच मूल्यात्मक आहे'. भारतातील सर्वांत प्रसिद्ध मूल्यमीमांसा धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या चार पुरुषार्थांच्या कल्पनेत व्यक्त झाली आहे. भारतीय कल्पनेप्रमाणे (प्राधान्याने समाजासाठी) 'जे इष्ट ते मूल्य होय'.

निकोलाय हार्टमन या तत्त्वज्ञानी व्यक्तीच्या मतानुसार मूल्ये ही सारतत्त्वे आहेत. मूल्यांची स्वतंत्र अशी सत्ता आहे. ती आदर्शाकडे जाणारी असतात, ती बनविता येत नाहीत, त्यांचा फक्त शोध लागतो. सर्व मूल्यांची जपणूक ज्यायोगे करता येईल, अशी त्यांच्यातील परस्पर-सुसंवादी, निर्दोष आणि परिपूर्ण मांडणी आपल्या अनुभवास येत नाही. मूल्यांच्या जगतात परस्परविरोध भरलेला आढळतो. कित्येक वेळा दोन किंवा अधिक मूल्यांमध्ये असा संघर्ष उभा राहतो की, त्या सर्वांना आपल्या कृतीने अस्तित्वात आणता येत नाही. निर्दोष व अव्यंग असे कर्म घडणे कठीणच असते. त्या त्या परिस्थितीनुसार काही मूल्ये घ्यावी लागतात तर काही सोडावी लागतात. म्हणून मूल्यात्मकदृष्ट्या सर्वकाळ निर्दोष आचरण ही एक असंभवनीय गोष्ट होय, असे दिसते. असे असले तरी मूल्यांचे महत्त्व काही कमी होत नाही. मानवाच्या जीवनाचा आदर्श व पूर्णतेची कल्पना, त्याच्या कर्माकर्मांचा विवेक मूल्यमीमांसेवर अधिष्ठित आहे. आदर्श समाजरचना व राज्यसंस्था, सामाजिक आणि राजकीय उद्दिष्टे आणि ध्येये मूल्यविचाराधिष्ठित असतात. व्यक्ती आणि व्यक्ती, व्यक्ती आणि समाज, व्यक्ती आणि राज्यसंस्था यांच्यामधील व्यवहार आणि आंतरराष्ट्रीय व्यवहार हा मूल्याधिष्ठित असतो. शिक्षणाची उद्दिष्टे आणि ध्येये मूल्यमीमांसेला धरून असतात. मूल्यांचे ज्ञान शैक्षणिक अभ्यासक्रमात असणे एवढेच आवश्यक नसून त्या मूल्यांचा संस्कार विद्यार्थ्यांच्या मनात विविध कृतींद्वारे दृढमूल करणे अगत्याचे ठरते.

उपनिषदांमध्ये विवरण केल्याप्रमाणे मूल्यांचे प्रकार आत्म्याच्या पंचकोशांवर आधारलेले आहेत. अन्नमय (भौतिक, अन्नवस्त्र आदी), प्राणमय (आरोग्य, बल, आयुष्य), मनोमय (मानसिक मूल्ये, भावना), विज्ञानमय (बौद्धिक, तत्त्वज्ञान), आनंदमय (नीती, कला, सर्जनशील, प्रतिभा) हे ते पाच कोश. म्हणजे, साधारणपणे असे म्हणता येईल की, माणसाची सहजप्रवृत्ती व भावना या आधारावर मूल्यांची गणना करता येते. उदाहरणार्थ, संग्रह करणे या सहजप्रेरणेवर आधारित असलेले आर्थिक मूल्य हे भौतिक गटात, क्षुधा, श्रम या प्रेरणांवर आधारित असलेले शारीरिक मूल्य हे शारीरिक गटात, समूहभावनेवर आधारित संघटन हे मूल्य सामाजिक गटात, आत्माविष्कार या प्रेरणेवर आधारित शील, चारित्र्य ही मूल्ये नैतिक गटात, रचना व अनुकरण या सहजप्रेरणांवर आधारित कला व सौंदर्य ही मूल्ये सर्जनात्मक गटात, कुतूहल, जिज्ञासा या सहजप्रेरणांवर आधारित बौद्धिक व सत्य ही मूल्ये वैज्ञानिक गटात तर श्रद्धा या प्रेरणेवर आधारित धार्मिक मूल्य हे आध्यात्मिक गटात समाविष्ट करता येईल. विविध देशांमधील समाजात अशीच काही मूल्ये काळाच्या ओघात रुजलेली असतात. कधीकधी मूल्ये रुजण्यासाठी सामाजिक परिस्थितीचा वा धर्माचाही उपयोग झालेला दिसतो. उदाहरणार्थ, पाश्चात्य देशांत लोकशाहीमूल्ये प्रस्थापित होण्यासाठी कॅथॉलिकधर्मियांनी घडवून आणलेल्या सुधारणा महत्त्वाच्या ठरल्या, असे म्हटले जाते.

**जीवनमूल्यांचा नव्या काळातील प्रवास**

नव्या अभ्यासानुसार चालू शतकातील समाजांची मूल्यांबाबतची भूमिका बदललेली दिसते ती प्रामुख्याने आर्थिक व सामाजिक विकासामुळे. या बदलांचे परिणाम राजकीय, आर्थिक, सामाजिक व धार्मिक क्षेत्रांवर होताना दिसतात. हे लक्षात घेता, देशादेशांमधील सामाजिक व आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन मूल्यांचे वर्गीकरण केले गेले आहे. साधारणपणे मूल्यांचे वर्गीकरण परंपरागत (Traditional), आधुनिक (Modern) आणि उत्तर आधुनिक (Postmodern) असे केले जाते. हे वर्गीकरण तसे ढोबळ म्हटले पाहिजे. कारण, प्रत्येक देशात निरनिराळ्या आर्थिक-सामाजिक स्तरांवरील विविध समाजगट अस्तित्वात असल्याने त्या देशात, त्या त्या गटागटांप्रमाणे मूल्यांबाबतच्या भूमिकेत बदल होताना दिसतात. तरीदेखील बहुतांश नागरिक ज्या गटात मोडतात त्या गटाच्या मूल्यांना व्यवहारात प्राधान्य मिळत असावे, असे गृहीत धरता येते. गरीब देशांमध्ये परंपरागत मूल्यांचा प्रभाव आढळतो. उदरनिर्वाहाच्या गरजा पूर्ण करण्याकडेच या समाजाचे लक्ष केंद्रित झाले असते. त्यामुळे धार्मिक श्रद्धा,

अधिकारी/नेतृत्ववर्गाप्रती एक प्रकारचा (भययुक्त ?) आदर, आज्ञाधारकपणा, मोठी कुटुंबे, पालकांप्रती व ज्येष्ठांप्रती अतिशय आदर, चांगल्या व वाईट गोष्टींबाबतची बहुतांश नागरिकांमध्ये असलेली स्पष्टता ही या देशांमधील परंपरागत मूल्ये असतात.

मध्यम उत्पन्न असणाऱ्या देशांमध्ये आधुनिक मूल्यांचा स्वीकार झालेला दिसतो. विज्ञान-तंत्रज्ञानावर विश्वास, प्रशासकीय बाबींना महत्त्व, ध्येयाकडे वाटचाल करण्यासाठी मेहनत करण्याची तयारी, सहिष्णुता, पैशाला मिळणारे महत्त्व, कौटुंबिक बाबींचा विचार करता स्त्रिया व मुले यांच्यातील भावनिक नात्याला महत्त्व देणे, मुलांच्या वाढीसाठी दोन्ही पालकांचे महत्त्व असते, हे मान्य करणे अशी काही मूल्ये या देशांमध्ये दिसतात. श्रीमंत देशांमधील नागरिकांचा कल उत्तर आधुनिक मूल्यांकडे झुकलेला दिसतो. अभिव्यक्ती स्वातंत्र्य, व्यक्तिगत निर्णयांना प्राधान्य, त्यानुसार आपल्या निर्णयाची जबाबदारी आपण स्वीकारणे, परिसरविज्ञानाला देण्यात येणारे महत्त्व, सहिष्णुता अशा काही मूल्यांचा यात समावेश होतो. दैनंदिन व्यवहारांत अनेकानेक पर्यायांची उपलब्धता असणे व त्यांचा वापर करता येणे अशा बाबीही तेथे महत्त्वाच्या ठरतात. मूल्यांच्या वर्गीकरणावर आधारित देशांचा विचार केला तर उत्तर आधुनिक मूल्ये स्वीकारणाऱ्या गटांत युरोप व स्कॅन्डेनेव्हियन देशांचा समावेश होतो. यात स्वीडन पहिल्या क्रमांकावर आहे. गंमत म्हणजे अमेरिकेचे स्थान श्रीमंत देशांमध्ये असले तरी मूल्यांचा विचार करता ते परंपरागत मूल्यांच्या अधिक जवळ जाते.

विविध समाजगटांनी वर्षानुवर्षे जतन केलेल्या मूल्यांना काळाच्या ओघात का नाकारले जाते, असा प्रश्न निर्माण होणे हे स्वाभाविकच असते. मूल्यांचा प्राधान्यक्रम बदलतो हा सिद्धान्त दोन गृहीतकांवर आधारित आहे. पहिले गृहीतक आहे अभावाचे (Scarcity). यात जगण्यासाठी किमान भौतिक गरजांची पूर्तता होणे आणि शारीरिक सुरक्षा मिळणे, या अग्रक्रमावरील बाबी असतात. त्यामुळे साहजिकच सर्वोच्च प्राधान्य या दोहोंनाच मिळते. याच्या उलट जेव्हा जीवनात समृद्धी असते तेव्हा भौतिक बाबींपेक्षा इतर काही म्हणजे आधुनिक व उत्तर आधुनिक मूल्यांकडे जाण्याची प्रवृत्ती वाढते. म्हणजे, दैनंदिन जीवनव्यवहारात किमान आर्थिक-सामाजिक सुरक्षा मिळाली तर प्राधान्यक्रमात पूर्वी मागे पडलेली व्यक्तीस्वातंत्र्यासारखी मूल्ये पुढे येतात. दुसरे गृहीतक आहे सामाजिकीकरणाचे (Socialization). व्यक्तीचे आर्थिक-सामाजिक पर्यावरण आणि मूल्यांबाबतचा तिचा प्राधान्यक्रम यांच्यातील परस्परसंबंधांची फेरजुळणी ही लगोलग होणारी बाब नसते. मूल्यव्यवस्था वा मूल्यांचा प्राधान्यक्रम बदलण्याच्या

# जागतिक खेड्याकडे वाटचाल नाही

जागतिकीकरणाच्या या युगातही विविध समाजगटांची मूलभूत मूल्ये आणि परंपरा टिकून राहतील, त्यामुळे मूल्यांच्या संदर्भात तरी जगाची वाटचाल एका खेड्याकडे होईल असे वाटत नाही, असे मत मूल्यव्यवस्थांचे अभ्यासक रोनाल्ड इंगलहार्ट यांनी मांडले आहे. सुमारे ८० देशांमधील नागरिकांची मते जाणून घेतल्यानंतर त्यांनी हे मत व्यक्त केले आहे. या देशांमधील समाजांची मूल्ये बदलत असली तरी त्यांची वाटचाल एकाच मूल्यव्यवस्थेकडे होणारी नाही. उलट, मूल्यांमधील विविधता कायमच राहिली असून ही विविधता अधिक प्रकर्षाने जाणवत आहे, असे त्यांनी स्पष्ट केले आहे. माहिती आणि दळणवळणाची साधने यांच्यासंदर्भात जागतिकीकरणाचा वेग प्रचंड असला तरी त्यामुळे मूलभूत मूल्येच बदलतील, असे होताना दिसत नाही. मात्र, मूल्यांच्या बाबतीत काही बदल होत असल्याचे नक्की दिसते. तसाच हा बदल एका दिशेकडे जाणारा असावा, असे वरकरणी पाहता वाटले तरी प्रत्यक्षात मात्र तशी स्थिती नाही. स्त्री-पुरुष समानता, चांगले प्रशासन आणि लोकशाही या मूल्यांना सध्या समाजव्यवस्थेत महत्त्व येत असल्याचे आढळते. गरीब व श्रीमंत देशांमधील दरी जेवढी वाढत जाईल, तेवढी त्यांच्या मूल्यांमधील दरीही रुंदावण्याची शक्यता आहे. तसेच श्रीमंत गटामधील विविध देशांची मूल्ये वेगाने बदलत जाऊ शकतात, त्यामुळे त्या देशांच्या बदलाला एक समान दिशा असू शकते. पण गरीब देशांबाबत असे घडेलच असे नाही. आर्थिक-औद्योगिक क्षेत्रात जागतिकीकरण होत असले तरी 'एकच जागतिक संस्कृती' उदयास येईल असेही नाही. औद्योगिकीकरणाच्या काळात परंपरागत मूल्यांची वाटचाल अधिक बुद्धिनिष्ठ आणि अ-धार्मिक मूल्यांकडे होत गेली; तर, सध्याच्या औद्योगिकीकरणानंतरच्या काळातील ही वाटचाल गटागटांच्या अस्तित्वासाठी आपली ओळख दर्शविण्यासाठी होताना दिसते. त्यामुळे सॅम्युअल हन्टिंग्टन यांनी 'क्लॅश ऑफ सिव्हिलायझेशन्स'मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे विविध सांस्कृतिक गटांत जगाची विभागणी होताना दिसते, या मताशी ते सहमती दर्शवितात. तसेच या काळात सांस्कृतिक विद्वेष वाढविणेही अतिशय सोपे झाले आहे, असे त्यांना वाटते. आता अधिकाधिक देशांमधील प्रशासनांनी नागरिकांची मूल्ये आणि त्यांची मते लक्षात घेण्याची गरज आहे कारण, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि चांगले प्रशासन यांच्यात परस्परसंबंध आढळतो, असे प्रतिपादन ते करतात. ✿✿

प्रक्रियेसाठी काही काळ जावा लागतो, असे मानण्यात आले आहे. उदाहरणार्थ, परंपरागत गटातील मूल्यांचा प्रवास आधुनिक गटातील मूल्यांकडे व आधुनिक गटातील मूल्यांचा प्रवास उत्तर आधुनिक गटातील मूल्यांकडे होण्याच्या दृष्टीने विविध समाजघटकांची मानसिकता बदलण्यास वेळ लागतो.

आजच्या काळाचा विचार करता, मूल्यांविषयीच्या नवनव्या अभ्यासांमधून पुढे आलेल्या माहितीद्वारे असे दिसून येते की व्यक्तीव्यक्तींच्या श्रद्धा व विश्वास आणि त्यांच्या समाजाची गुणवैशिष्ट्ये यांच्यात घट्ट परस्परसंबंध असतो. उदाहरणार्थ, नागरिकांची मूल्ये आणि त्या समाजातील जन्मदर यांच्यात हा संबंध आढळतो; तसेच समाजांमधील राजकीय संस्कृती आणि लोकशाही संस्था यांच्यातही संबंध दिसतो. औद्योगिकदृष्ट्या प्रगत देशांमधील नागरिकांच्या मूल्यांत व प्रेरणांमध्ये एक पद्धतशीर बदल होताना दिसतो. यामुळे या नागरिकांच्या कामाच्या क्षेत्रावरही या बदलांचा परिणाम होतो. उदाहरणार्थ, विज्ञान-तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या प्रेरणा वा मूल्ये बदलतात तेव्हा त्या जागतिक पातळीवर विचार करतात आणि सर्वांना विशेषतः गरीब देशांमधील नागरिकांना उपयुक्त ठरू शकेल असे विज्ञान-तंत्रज्ञान आकाराला येऊ शकते. मग उपासमारीने अथवा रोगराईने मृत्यूमुखी पडणाऱ्यांची संख्या घटू शकते.

हा अभ्यास करताना देशोदेशींच्या नागरिकांची समाधानाची पातळी मोजण्यात आली. तेव्हा, आर्थिक विकासाशी त्याच्या असणाऱ्या संबंधांवर शिक्कामोर्तब झाले. समाधानाच्या सर्वांत खालच्या पातळीवर साम्यवादी देशांमधील नागरिकांचा क्रमांक असणे, ही बाब मूल्यांचा विचार करता अधोरेखित करावी अशी आहे. पण भौतिक सुखाचा विचार करता एका मर्यादेपलीकडे आर्थिक विकास आणि समाधान यांच्यात परस्परसंबंध आढळतोच असेही नाही. साधारणपणे असे आढळते की, आर्थिक विकास व समाधान यांच्या संबंधातील सर्वोच्च पातळी गाठली गेल्यानंतर आपल्याला जे समाधान मिळाले ते इतरांनाही मिळावे, या भूमिकेत नागरिक/समाजगट शिरत असावेत. यामुळे काही मूल्ये बदलत असावीत. या वेळी आर्थिक फायद्याचे नेहमीचे गणित बदलते आणि पर्यावरणाच्या संतुलनाचे रक्षण व जीवनशैली ही मूल्ये विचाराच्या कक्षेत प्रवेशतात. मग नफ्यात घट सोसूनही बदललेल्या मूल्यांना प्राधान्य देण्यात येते. या प्रवासातच अलीकडे पर्यावरण, स्त्रियांची सामर्थ्यशीलता लक्षात घेऊन त्यांना न्याय्य हक्क मिळावेत यासाठीचे प्रयत्न (एम्पॉवरमेंट), संस्कृतींमधील विविधता अशा

*(पृष्ठ २५ वर पाहावे)*

# मूल्य जपानी 'मा'चे

'पूर्वेकडील अमेरिका' अशी ओळख असणाऱ्या जपानने औद्योगिकतेत व सर्वंकष प्रगतीत बराच मोठा पल्ला गाठला आहे. पाश्चिमात्यकरण व आधुनिकीकरण चटकन स्वीकारलेल्या या देशाने पाश्चिमात्यांचा ख्रिश्चन धर्म व त्यांची व्यक्तीवादी मूल्ये मात्र स्वीकारली नाहीत. उलट, आजही तेथील धर्म व सांस्कृतिक परंपरा टिकून राहिलेली आहे. त्यामुळे जपानमधील सांस्कृतिक व धार्मिक मूल्यांबाबत जगभरात कुतूहल व्यक्त करण्यात येते. जपानच्या संस्कृतीत असे आढळून येते की, 'स्वतःची व स्वतःच्या समाजाची प्रगती करणे', हे तेथील शिंतो धर्मातील एक 'मूल्य' आहे. त्यामुळे आधुनिकीकरण व पाश्चिमात्यकरण स्वीकारतानादेखील आपला समाज स्पर्धेत टिकला पाहिजे, ही स्पष्ट भूमिका जपानमधील सरकारची व नागरिकांची होती. त्यामुळे पाश्चिमात्यांशी स्पर्धा करणे आणि त्यासाठी आपल्या व्यवहारात बदल करणे, हे त्यांना अडचणीचे वाटले नाही. या प्रगतीशील समाजाचे हे काळानुरूप बदलणे उल्लेखनीय म्हणता येईल.

या अशा प्रगतीशील समाजजीवनाला व्यापून राहिलेले एक वेगळे सांस्कृतिक मूल्य (वा संकल्पना) आहे 'मा'चे. याचा अर्थ आहे 'कोणत्याही दोन घटकांमधील अंतर'. ते कालबाधित (Temporal) वा अवकाशीय (Spatial) अशा दोन्ही प्रकारचे असू शकते. हे 'मा' दोन वस्तूंमधील असते, तर दोन माणसांमधील वागणुकीच्या संदर्भातही ते असते. मानव व त्याच्या सभोवतालचा परिसर यांच्यातही 'मा' असते. जपानची संस्कृती व जपानी माणसाची वागणूक जाणून घेण्यासाठी 'मा' समजून घेणे महत्त्वाचे ठरावे. जपानी संस्कृतीच्या सौंदर्यविषयक दृष्टीचे मूल्य 'मा' आहे (सौंदर्यदृष्टीचा विचार करणाऱ्या भारतीय अभ्यासकांनी रूपभेद, भावदर्शन, प्रमाण, सादृष्य, लावण्य आणि रंगसंगती यांचा विचार केला असून त्यानुसार अंतराचा विचार 'लावण्य' या गटात मोडतो). त्यामुळे घराच्या सजावटीपासून ते नागरिकांच्या दैनंदिन व्यवहारातील अनेक बाबींमध्ये 'मा' असते. खरे तर, जपानची संस्कृती ही काही 'विशिष्ट रचनांमध्ये बद्ध' ('कल्चर ऑफ फॉर्म्स') अशी आहे. उदाहरणार्थ, चहापान हा त्या संस्कृतीचा एक मोठा घटक आहे. टेबल-खुर्च्यांपेक्षा चटया, गालिचे यांचा वापर करून चहापानाची

बैठी व्यवस्था असणे हे तेथील वैशिष्ट्य. या प्रकारात चहाची ठरावीक भांडी ठरावीक पद्धतीने मांडणे, याला तेथे फार महत्त्व आहे. ही संपूर्ण रचना १२ आयतांमध्ये असणे चांगले मानले जाते. अर्थात, ही रचना करताना असे आयत हे काल्पनिकच (आयताच्या काल्पनिक रेषा म्हणजे 'केन') असतात, पण तेथील जीवनाचा परिचय असणाऱ्यांच्या नजरेला ते चटकन भावतात. चहापानासाठी असणाऱ्या 'टाटामी' चटईच्या बरोबर मध्यभागी जर चहाची किटली ठेवण्यात आली असेल तर ती 'मौल्यवान' आहे, असा संकेत येणाऱ्या पाहुण्यासाठी असतो.

दैनंदिन व्यवहारातील अशा काही पद्धतींना तेथे महत्त्व देण्यात येते व या पद्धती सर्वांना अवगत असणे हेही अपेक्षित असते. अशाच प्रकारे जपानमधील नाटकाचा विशिष्ट असा 'फॉर्म' असतो. त्यातील शब्दरचना व अभिनय सुरुवातीपासून शेवटापर्यंत काही विशिष्ट रचनेत गुंफलेले असणे, अपेक्षित आहे. नृत्याचे क्षेत्रही असेच आहे. जपानमध्ये कलावंतांना असे 'फॉर्म' येणे हे महत्त्वाचे असते. त्यामुळे कधीकधी व्यक्तींच्या नैसर्गिक प्रतिभेला मर्यादाही येतात, असे म्हटले जाते.


पण हे 'फॉर्म समजून घेताना त्यातील बारकावे जाणले तर त्या 'फॉर्म'ची मजा आणखी वाढते. उदाहरणार्थ, चहापानाच्या वेळी मौल्यवान असणारी किटली कधीकधी बरोबर मध्यभागी न ठेवता मध्यबिंदूच्या किंचित अंतरावर ('मा') ठेवण्यात आली असेल तर ती अभिरुचीची आणखी पुढची पायरी ठरते. पण हा गूढ संकेत सर्वांना समजतोच असे नाही. कारण तो एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे मौखिक परंपरेने आलेला असतो, तो लेखी स्वरुपात नसतो.

तसेच, नृत्यात ताल व लय सतत सांभाळणे हे नवशिक्यांचे काम मानले जाते; तर, किंचिंतशा फरकाने ताल चुकविणे व काही क्षणांतच पुन्हा ताल पकडणे (यांतील अंतर हे 'मा') हे जाणकाराचे काम समजले जाते (या प्रकाराला 'ऑफ बीट' म्हणतात ?). 'फॉर्म'ला महत्त्व असले तरी शंभर टक्के अचूक असतो तोच 'फॉर्म' खरा, असे येथे मानले जात नाही. हा जो बदल वा आदर्श 'फॉर्म'पासून किंचित दूर जाणारी जी कृती असते, तिथे 'मा'चा संदर्भ असतो. 'फॉर्म'च्या इतकेच किंबहुना 'फॉर्म'पेक्षा जरा जास्त महत्त्व 'मा'ला असते. तसेच 'मा' कधी अवकाशीय (Spatial - उदाहरणार्थ, चहाची किटली मध्यबिंदूपासून किंचित दूर ठेवणे) तर 'मा' कधी कालबाधित (Temporal - उदाहरणार्थ, नृत्यात ताल चुकविणे व पुन्हा तो पकडणे यांतील अंतर) असते.

**मानवी संबंधांमध्ये 'मा'**

जपानी नागरिकांच्या वागणुकीत व दृष्टिकोणातही 'मा'चा प्रभाव जाणवतो. तेथील सामाजिक संबंधांमध्ये, नागरिकांच्या आचारविचारांमध्ये परस्परांबद्दलची एक सजगता असते. समाजव्यवहारांमध्ये आपण कुणाच्या तरी टीकेचे धनी बनू नये, याची काळजी सर्वजण घेत असतात. ही बाब 'मा'शी जोडली जाते. यासाठी जुन्या काळातील सामुराईची काल्पनिक कथा सांगण्यात येते. एके दिवशी एका सामुराईकडे काही तातडीच्या कारणाने एक व्यापारी आपले काही पैसे ठेवतो. ही बाब कुणाला माहिती नसते आणि पुढे काही घडायच्या आत तो व्यापारी अचानक स्वर्गवासी होतो. आता त्या पैशांचे काय करायचे, असा प्रश्न स्वाभाविकच सामुराईला पडतो. पण, समजा त्या व्यापाऱ्याच्या कुटुंबियांना ही बाब माहिती असेल तर आपली जनमानसातील प्रतिमा डागाळेल, या विचाराने वाईट कृती करण्याचा (स्वतःसाठी ते पैसे वापरण्याचा) मोह टाळून तो प्रामाणिकपणे ते पैसे व्यापाऱ्याच्या कुटुंबियांना देतो. म्हणजे, वाईट कृतीपासून दूर राहणे याला प्रथम महत्त्व आहे. हे अंतर ('मा') सांभाळले की आपोआप चांगली कृती करण्यास माणूस प्रवृत्त होतो, हा कथेचा सांगावा. 'मा'चा दृष्टिकोण अंगी बाणवला की परस्परांबद्दलची सजगता मनात निर्माण होते व माणसे चांगल्या वागणुकीसाठी प्रेरित होतात. मग, हळूहळू ही चांगली वागणूक अंगवळणी पडते, असे म्हटले जाते. पाश्चात्य संस्कृतीत, दुसऱ्यांचा विचार करून आपली वागणूक सुधारणे हे कदाचित महत्त्वाचे ठरणार नाही, मात्र जपानमध्ये हा समाजव्यवहाराचा केंद्रबिंदू ठरतो. आपले वर्तन कोणी बघो वा न बघो, आपण नेहमी चांगलेच वागावे, हे सूत्र जपानी नागरिकांना माहिती नाही, असेही नाही. मात्र, माणसे चुकू शकतात म्हणून चांगल्या वर्तनाची सवय त्यांना लागावी, यासाठी जपानच्या संस्कृतीत ही सोय ठेवली असल्याचे दिसते.

व्यक्ती व समाज यांच्यातील परस्परसंबंध दर्शविणारी 'सेकेनतेई' अशी एक संकल्पना जपानमध्ये आहे. व्यक्तीचा जवळच्या संबंधांमधील नातेवाईक आदींचा गट (उची), परिचित नागरिकांचा गट (सेकेन) आणि अगदीच अपरिचित असे जग (सोतो) या गटांमध्ये (सोबतची आकृती पाहावी) मानवी व्यवहार



घडतात, अशी ही संकल्पना. 'उची गटातील सदस्यांमध्ये एकीची भावना असते. एकमेकांच्या वर्तनावर त्यांचे बारीक लक्ष असते. पण गटाबाहेरच्या लोकांनी गटातील सदस्यांवर टीका केल्यास ते सर्व एकमेकांना सांभाळून घेतात व एकत्रितपणे टीकेला उत्तर देतात. 'सेकेन' गटातील कोण आपल्या वर्तनावर लक्ष ठेवून आहे वा कोण नाही, हे 'उची' गटातील नागरिकांना समजून येत नाही. तर 'सोतो' हे अगदीच अपरिचित नागरिक असतात. या गटाबरोबर व्यवहार करताना जपानी नागरिकांचा खरा कस लागतो, असा मतप्रवाह आहे. समाजजीवनात अशा वेगवेगळ्या गटांबरोबर व्यवहार करतानाही परस्परांपासून एक विशिष्ट अंतर ('मा') राखणे याला तेथे महत्त्व आहे. या वेळी असे अपेक्षित असते की, एकीकडे व्यक्तीने समाजजीवनाशी जोडलेही जायला हवे; तर दुसरीकडे, त्यात खूप जास्त गुरफटूनही जायला नको. मानवी संबंधांमध्ये अशी एक 'मानसिक दूरी' कायम राखण्याचा हा शिष्टाचार तेथे आजही पाळला जातो. जपानमधील या प्रकाराला 'इंटरपर्सनॅलिझम' असे काहींनी संबोधले आहे.

जपानी नागरिकांच्या मनातील एक कल्पना 'पोकळ गाभा/केंद्रबिंदू' ('हॉलो सेंटर') अशी असल्याचे मत जपानमधील मानसशास्त्रज्ञ कावाइ हयाओ यांनी मांडले आहे. या अर्थाने, या गाभ्याभोवतीच जपानची संस्कृती, समाजजीवन व मानवी संबंध हे आकाराला आले आहेत, असे दिसते. संपूर्ण समाजव्यवस्थेत जेव्हा केव्हा संघर्षाचे प्रश्न उद्‌भवतात, तेव्हा हा गाभा हे सर्व आघात सोसण्याच्या कामी 'बफर' (आघातरोधक) म्हणून भूमिका पार पाडतो. तसे हे रिक्त स्थान असल्याने तेथे कोणाचेच नेतृत्व चालत नाही. तेथील समाजव्यवस्थेत राजाची भूमिका नेमकी अशीच राहिली आहे, असे आढळते. हा 'पोकळ गाभा/ केंद्रबिंदू' म्हणजे 'मा'च होय. वरकरणी पाहता हा गाभा पोकळ वाटत असला तरी तो भरीव व महत्त्वाचा असतो. जेव्हा दोन परस्परविरोधी गोष्टी पुढे येतात तेव्हा त्या दोहोंमधील अंतर हे खरे तर 'मा'ने स्पष्ट होते. उदाहरणार्थ, जपानमधील नाटकात काही विशिष्ट प्रसंगात कलावंताने पाय स्टेजवर आपटायचा असतो. दुसऱ्यांदा पाय आपटण्याच्या प्रसंगाआधी या दोन कृतींमधील अंतर ('मा') हे खरे तर नाट्यकृती यशस्वी होण्यामागील सौंदर्य असते. ड्रम वाजवितानाही असेच असते. एक ड्रमबीट आणि दुसरी ड्रमबीट यांच्यातील अंतर हे प्रभावी ठरते. म्हणजे, एका अर्थाने 'मा'चा पोकळपणा हा भरीव, ठसठशीत व सूचक असा असतो.

वास्तुरचनाशास्त्र (आर्किटेक्चर), गृहसजावट वा फर्निचरची मांडणी करतानाही 'मा' ही संकल्पना महत्त्वाची भूमिका निभावते. जपानमधील कला, साहित्य आणि

समाजव्यवहार या सर्वांमध्ये 'मा' असतेच. भाषेतही 'मा'चा वापर केला जातो. त्याचा अर्थ विशिष्ट शब्दाशी जोडली गेलेली जागा (रिलेटिव्ह स्पेस) असा असतो. जसे की 'इमा' ('लिव्हिंग स्पेस'), 'नेमा' ('स्लीपिंग स्पेस'), 'चानोमा' ('टी स्पेस' म्हणजे 'लिव्हिंग रुम'). इंग्रजी भाषेत मात्र 'स्पेस'चा अर्थ 'रिकामी जागा' असा घेतला जातो. 'मा'ची व्यापकता लक्षात घेता अमूक एका पद्धतीने केली जाणारी कृती म्हणजे 'मा' असे म्हणता येईल, असे काही त्याचे ठरावीक नियम नाहीत. त्यात लवचिकता बरीच असते. उदाहरणार्थ, चहापानाच्या प्रसंगात काही बदल घडून आले आहेत. त्यानुसार नव्या पद्धतीला 'वाबी' म्हटले जाते. 'वाबी' म्हणजे एकटेपणा. 'अपूर्णतेतील सौंदर्य' किंवा 'चट्कन दृष्टीस न पडणारे सौंदर्य' या शब्दांमध्ये 'वाबी'चे वर्णन केले जाते.

एकंदरीत पाहता जपानी लोकांची सर्जनशीलता ही 'मा'भोवती केंद्रित झाल्याचे दिसते. तरीदेखील जपानी नागरिकांची 'सांस्कृतिक ओळख' म्हणजे 'मा' असे अद्याप म्हटले जात नाही. सांस्कृतिक ओळख या संकल्पनेचा उगम, अलीकडच्या काळात पाश्चात्य देशांमध्ये झालेला दिसतो आणि तेथेच ती जास्त चर्चिली जाताना दिसते. पाश्चात्यांना या संकल्पनेमधून जे काही अपेक्षित आहे त्याच अर्थाने ती संकल्पना आशियाई देशांमध्ये वापरली जाईल वा ना जाईल; पण, जपानची ओळख कोणती असा प्रश्न या संदर्भात पुढे आला तर त्याचे उत्तर 'मा' असे देणे संयुक्तिक ठरेल. कारण, ज्या वेळेला जी परिस्थिती समोर उभी ठाकते, तिला सामोरे जाण्यासाठी 'मा'चा उपयोग अनेक ठिकाणी करता येणे शक्य होते. असे असूनही अलीकडच्या काळात जपानमध्ये 'मा'चा वापर अपेक्षित एवढा होत नसल्याचे आढळते. जपानी नागरिक आपली 'मा'ची क्षमता हरवत चालले आहेत की काय, अशी शंका या विषयाच्या अभ्यासकांना वाटते आहे. स्वयंशिस्तीला मदत करणाऱ्या 'सेकेन'ला पूर्वीसारखे महत्त्व आता देण्यात येत नाही. जागतिकीकरणामुळे समाजव्यवहारांमध्ये काही प्रमाणात बदल होत आहेत. मोबाइल फोन, ई-मेल अशी संपर्काची साधने अनेकांच्या हाती असल्याने माणसामाणसांमधील संबंध आता वरवरचे होऊ लागले आहेत. या बदलामुळे जपानच्या समाजजीवनातील 'मा' सारख्या मूल्यांना बढावा न मिळता ती विस्मृतीकडे जाताना आढळतात. त्यामुळे जपानी समाजव्यवस्था स्थित्यंतराच्या अवस्थेत आहे, असे मत मांडण्यात येत आहे. तथापि, काळाच्या ओघातही 'मा'चे मूल्य टिकेल, असा आशावाद तेथे व्यक्त करण्यात येतो. ✿✿

# कलेतून 'अर्था'नंद

गुजरातमधील कच्छ हा भाग, दक्षिणेच्या बाजूने अरबी समुद्राने वेढलेला, तर उत्तरेच्या बाजूने वाळवंटाने घेरलेला. कच्छचे नाव घेताच अलीकडे आठवतो तो भूकंप. येथील नागरिक शेकडो वर्षापूर्वी भारतात आलेल्या स्थलांतरितांचे आणि आक्रमकांचे वंशज. सुमारे १२ लाख एवढी लोकसंख्या असणाऱ्या या नागरिकांमध्ये वांशिक व सांस्कृतिक विविधताही तेवढीच अधिक तसेच ते अनेक जातींमध्ये विभागलेही गेले आहेत. विकासापासून दूरच राहिलेल्या या भागातील नागरिकांची आर्थिक स्थिती तशी बेताचीच. स्त्रियांचे शिक्षण व त्यांचे अर्थार्जन हे विषय त्यांच्या समाजजीवनाच्या परिघावरच थबकलेले. अशा परिस्थितीत तेथे 'सृजन'चे आगमन झाले. दुष्काळामुळे गांजलेल्या नागरिकांना मदत करणारी, त्यांच्यात नवी आशा निर्माण करणारी व रचनात्मक दृष्टिकोण जागविणारी 'सृजन' ही एक स्वयंसेवी संस्था. चंदा श्रॉफ (आता वय ७३) या सहृदयी महिलेने १९६९मध्ये स्थापन केलेल्या या संस्थेने आज तेथील समाजात, विशेषतः स्त्रियांमध्ये खरोखरच नवचैतन्य जागविले आहे ते संस्कृतीने, परंपरेने त्यांच्या हाडीमाशी खिळलेल्या उपजत कलेला वाव देऊन.

अप्रतिम कशिदाकाम ही येथील स्त्रियांना सहज येणारी कला. केवळ कपडे सुशोभित करणे वा घराच्या सजावटीत उपयोग करणे एवढाच त्या कलेचा उपयोग नाही. तर, आपल्या व्यक्तिगत, सामाजिक व आध्यात्मिक विचारांची अभिव्यक्ती करण्याचे त्यांचे ते एक साधनही आहे. कशिदाकाम, भरतकाम केलेला त्यांचा एकेक नमुना त्यांच्या जीवनात सौंदर्य तर आणतोच, शिवाय, तेथील नैसर्गिक परिस्थितीमुळे कंटाळलेल्या जीवनात आनंदाची भावना निर्माण करतो. कशिदाकाम असणाऱ्या या सुरेख वस्तू लग्नात हुंडा म्हणून देण्यात येतात. तर अभिजन वर्गासाठी त्या वस्तू प्रतिष्ठेचे व श्रीमंतीचे लक्षण असते. कशिदाकाम असलेल्या वस्तू हा तेथील जनजीवनाचा अविभाज्य घटकच जणू. पण या कलेतून या समाजाला आर्थिक फायदा होईना. कारण, आधुनिक काळ, काम, वेगाचे गणित न जमणे आणि सिंथेटिक कपडे वापरण्याची फॅशन यांमुळे या कलेकडे कोण ढुंकून बघणार ? त्यातच या स्त्रियांना उत्पादन, बाजारपेठ इत्यादींची माहितीही नव्हती. अशा परिस्थितीमुळे या कलेला ग्रहण

लागण्याची वेळ आली. या वेळी 'सृजन' मदतीला धावली. चंदा श्रॉफ यांनी क्राफ्ट शिकविण्याचे प्रशिक्षण घेतले होते. त्यामुळे या महिलांच्या अंगभूत कौशल्याला वाव देण्यासाठी त्यांनी 'सृजन'च्या माध्यमातून प्रयत्न केले. प्रथम त्यांनी एका खेड्यातील ३० स्त्रियांना कशिदाकाम करण्याची साधनसामग्री पुरविली. कशिदाकामाच्या काही नवीन रचना सांगितल्या. त्याद्वारे, लग्नकार्याशिवाय एकत्र न येणाऱ्या या स्त्रियांना एकत्र येण्यासाठी एक संधी उपलब्ध झाली. कशिदाकामाच्या ज्ञानाची देवघेव करताकरताच त्या एकमेकींची सुखदुःख वाटायला शिकल्या.

हळूहळू या स्त्रियांची संख्याही वाढू लागली आणि कशिदाकामाचा वेगही. मग कालांतराने हा सगळाच व्याप वाढला. 'सृजन'मुळे १२० खेड्यांमधील सुमारे २२ हजार स्त्रिया यात सहभागी झाल्या. त्यांच्यातील जातीभेदाच्या सीमारेषा पुसट होऊ लागल्या. उत्कृष्ट कशिदाकाम करणाऱ्या दलित समाजातील एका गुणी स्त्रीला काही वर्षांपूर्वी अहिर व सोधा जातींच्या घरांचा उंबरठा ओलांडणे अशक्य होते. तो ओलांडण्याचे धाडस करण्याची कृती या जातींमध्ये 'सृजन'मुळे घडून आली. आता ही दलित स्त्री इतर जातींमधील स्त्रियांची कशिदाकामातील शिक्षिका आहे. त्यांच्यातील ऊठबस (आणि रोटीव्यवहारही) वाढली आहे.

कशिदाकामाचा विचार करता या प्रत्येक जातींचे कलेतील एक वैशिष्ट्य आहे. कशिदाकामाचे किमान १६ वेगवेगळे टाके सर्वांमध्ये समान असले तरी त्यांची वेगवेगळी संगती करण्याने नवनवीन रचना तयार होत जातात. यात बरीच व्यामिश्रता असते. राबरी कशिदाकामात मोठी चित्रे आणि पुराणकथांचा संदर्भ असतो. अहिर कशिदाकामात वक्राकाराला महत्त्व देण्यात येते. तसेच मोर, पोपट, हत्ती आणि फुले या चित्रांची रेलचेल असते. सूफ या कशिदाकामात भौमितीय आकृत्या जास्त प्रमाणात असतात. इतर काही प्रकारांत आरसेकाम जास्त असते. रंगसंगतीचा विचारही या सर्वांमध्ये केलेला आढळतो. राबरी प्रकारात पांढरा व मातीचे रंग असतात. तर, अहिर प्रकारात गडद जांभळा, सोनेरी आणि लाल रंगाचा वापर होतो.

कच्छमधील या कशिदाकामात प्रथमपासूनच दर्जाला महत्त्व देण्यात येत होते. ही परंपरा कसोशीने जपण्यावर 'सृजन'ने भर दिला. दर्जेदार कलाकौशल्य असणाऱ्या या स्त्रिया अतिशय परावलंबी जीवन जगत होत्या. त्यांची असहायता दूर करण्याचा निर्धार चंदा श्रॉफ यांनी केला. त्यांचा आत्मविश्वास वाढावा व दर्जा टिकून राहावा यासाठी प्रत्येक कलाकृतीवर ती कला साकारणाऱ्या स्त्रीचे नाव लिहिले जावे, असे

त्यांनी ठरविले. यामुळे कलाकार म्हणून त्यांना मान्यता मिळाली, तसेच ही कला टिकविणाऱ्या व वाढविणाऱ्या स्त्रियांच्या यादीत त्यांचे नाव गेले. 'सृजन'ने चिकाटीने केलेल्या प्रयत्नांना यश आले आणि या कलेमधून सर्व स्त्रियांची मिळकत वाढू लागली. आर्थिक स्थिती बरी होऊ लागल्याने या स्त्रियांना त्यांच्या समाजात मान मिळू लागला. तसेच त्यांचे व त्यांच्या कुटुंबियांचे आरोग्य चांगले राहू लागले.

असे एकेक पाऊल पुढे पडत असले तरी एवढ्याने प्रश्न सुटणार नव्हता. कारण, ही कला टिकवायची आणि वाढवायची असेल तर यात मुलींचा, तरुण स्त्रियांचा सहभाग वाढायला पाहिजे, हे श्रॉफ यांना प्रकर्षाने जाणवले. कलेचे संवर्धन, शिक्षण, उद्योजकता आणि त्याद्वारे स्त्रियांचे सक्षमीकरण (एम्पॉवरमेंट) व्हायला हवे, असे श्रॉफ यांनी ठरविले. यातूनच कलेचा गौरव करून त्यातून उद्योजकतेचा पाया घालणारी 'प्राइड अँड एन्टरप्राईज' अशी योजना तेथे कार्यान्वित झाली. याचा पहिला टप्पा म्हणजे कशिदाकाम केलेल्या १२०० रचनांचे एक प्रदर्शन 'सृजन'च्या कार्यालयात भरविण्यात आले. यात ३० ते ८५पर्यंतच्या सर्व वयोगटातील स्त्रिया सहभागी झाल्या होत्या. या कलाकृतींना देशविदेशातून कौतुकाची पावती मिळाली. वॉशिंग्टन येथील 'स्मिथसोनियन इन्स्टिट्यूटशन्स'च्या 'म्युझियम ऑफ एशियन आर्ट'च्या माजी प्रमुखांनीदेखील या कलेला गौरविले. आता त्यापुढचे पाऊल म्हणून 'सृजन'तर्फे 'मोबाइल ट्रेनिंग युनिट' स्थापन करण्यात येत आहे. ज्या स्त्रियांना घराबाहेर वा गावाबाहेर फार काळ देता येत नाही, त्यांच्यासाठी हे प्रशिक्षण फार उपयुक्त ठरणार आहे. हे सर्व उपक्रम राबविताना या महिलांमधूनच डिझाइनर प्रशिक्षक, विक्रीविभाग सांभाळणाऱ्या स्त्रियांचा गट आणि उद्योजक स्त्रियांचा गट स्थापन व्हावा, यासाठी श्रॉफ प्रयत्नशील आहेत. यासाठी स्वयंसहायता गटांची मदतही घेतली जात आहे. तथापि एकटी 'सृजन' यासाठी पुरेशी नाही, म्हणून 'सृजन'सारख्या अनेक संस्था उभ्या राहाव्यात आणि त्या संपूर्ण कच्छभर वाढाव्यात, असे मत श्रॉफ तळमळीने मांडतात.

ग्रामीण भागातील महिलांच्या जीवनाला 'अर्थ' देणाऱ्या, त्यांच्या कलेतून त्यांना 'अर्थ' व 'आनंद' (अर्थानंद) देणाऱ्या श्रॉफ यांना मानाचा समजला जाणारा 'रोलेक्स' पुरस्कार मिळाला आहे. त्यांच्या मते, 'सृजन'मध्ये सहभागी झालेल्या सर्व महिला या एकाच कुटुंबातील सदस्यांसारख्या आहेत. 'सामूहिक ज्ञान' व 'कृती' यांमुळे या कोणत्याही परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी या विस्तारित कुटुंबाचा आत्मविश्वास वाढला आहे. ✿✿

# 'बाहेर'च्यांची 'कॉन्ट्रिब्यूशन'....

'इन्टेल', 'याहू', 'गूगल', 'ई - बे', 'सन् मायक्रोसिस्टिम्स्'..... पाच नावे. माहिती तंत्रज्ञानाच्या (आणि माहिती जालाच्या) आजच्या युगात ज्या काही नावांचा जप केल्याखेरीज मोक्षमुक्ती काही म्हणजे काही मिळणार नाही, अशांतली ही काही नावे..! या पाचांमध्ये काय साम्य आहे हो.....? साम्य म्हणा साधर्म्य म्हणा, म्हटले तर आहे, म्हटले तर नाही. या पाचही कंपन्या अमेरिकी आहेत..... जरा थांबा ! 'कंपन्या अमेरिकी आहेत' हे विधान म्हटले तर सत्य आहे म्हटले तर पुरते सत्यही नाही. या कंपन्या अमेरिकी आहेत एवढ्यापुरतेच हे साम्य सीमितही नाही. या कंपन्या जरी अमेरिकी असल्या तरी त्यांचे प्रवर्तक-संस्थापक मात्र मूळचे अमेरिकी नाहीत.... ते आहेत 'बाहेर'चे...! आपल्याकडची परिभाषा वापरावयाची झाली तर या कंपन्या (अमेरिकी) भूमिपुत्रांनी स्थापन केलेल्या नाहीत. या कंपन्या म्हणजे, अन्य देशांतून येऊन अमेरिकेत आपले कर्तृत्व फुलविलेल्या हिकमती उद्योजकांच्या उद्यमशीलतेचे जणू दीपस्तंभच.... जागतिकीकरणाच्या आजच्या युगात स्थलांतरितांना देशोदेशी होणाऱ्या विरोधापायी अंधारू पाहत असलेल्या वैश्विक विकासाच्या वाटा उजळणारे दीपस्तंभ...!

सुमारे तीन दशकांपूर्वी तैवानमधून अमेरिकेच्या पंथाला लागलेल्या जेरी यांगच्या कुटुंबियांना लिंकनच्या अमेरिकेने थारा दिला नसता तर आज 'याहू'चे नावही जगाच्या समोर आलेच नसते. हा जेरी यांग कोण... तर, 'याहू'चा सहसंस्थापक. अमेरिकी समाजाने, तेथील एकंदर वातावरणाने, जगभरातून अमेरिकेत आलेल्या हिकमती मुशाफिरांच्या सामूहिक आणि तितक्याच कल्पक उपक्रमशीलतेने जेरीच्या ठायी असणाऱ्या नवसर्जनशीलतेच्या आविष्कारास पूरक असे पर्यावरण पुरविले आणि जेरीने अमेरिकेत लावलेल्या 'याहू'च्या रोपाचा वेलू विश्वाच्या गगनावर गेला. अखेर, 'ऋषीचे कूळ आणि नदीचे मूळ' शोधू नये असे म्हणतात, ते काही खोटे नाही. विशेषतः, उदारीकरण आणि जागतिकीकरणाच्या प्रक्रियेद्वारे विलक्षण वेगाने निकट येत असलेल्या आजच्या जगात तर मुळीच हा खटाटोप करू नये. कारण, आजच्या या जगात खरोखरच 'घरचा' (स्थानिक) आणि 'बाहेरचा' या संज्ञांना फारसा अर्थ

उरलेला नाही. त्यातही पुन्हा या (तथाकथित) 'बाहेरच्यां'नी स्थानिक अर्थकारणाच्या विकास-विस्तारात केलेली 'कॉन्ट्रिब्यूशन' निरखून पाहिली तर, स्थलांतरणाद्वारे आपल्या प्रांतात वा देशात प्रवेशणाऱ्या उद्यमशीलतेला, कल्पकतेला, सर्जनशीलतेला विरोध करणे हा अंती कोतेपणाच ठरतो, याची खात्री पटते.

जागतिकीकरणाच्याबाबतीत 'पिंडी ते ब्रह्मांडी' या म्हणीची प्रचिती पदोपदी येते. आर्थिक पुनर्रचनेच्या प्रक्रियेला एरवी (अडतपडत-अडखळत-आडवळणाने)पाठिंबा देणारे, त्या प्रक्रियेचा अंगीकार करणारे 'कामगार सुधारणा' या संकल्पनेतील 'क' जरी उच्चारला तरी लगोलग हाताच्या मुठी वळून विळा-हातोडा धारण करतात. हेच वास्तव अंमळ वेगळ्या स्वरूपात जागतिक स्तरावर साकारते. उदारीकरणाच्या माध्यमातून जोवर केवळ परकीय भांडवलच काय ते देशी अर्थव्यवस्थेत प्रवेश करीत असते तोवर जागतिकीकरणाच्या लाभांचे गोडवे गायले जातात. परंतु, ही प्रक्रिया जशी अधिक सघन बनते आणि भांडवलापाठोपाठच मनुष्यबळही जेव्हा देशी अर्थकारणाच्या उंबरठ्यावर येऊन उभे ठाकते तशी भांडवलासाठी सताड उघडलेल्या महादरवाजाचा दिंडी दरवाजाही कड्याकुलुपे घालून दडपला जातो. आज जगभरात ठायीठायी बहुसांस्कृतिकतेचा जो वाद या ना त्या स्वरूपात डोके वर काढताना दिसतो त्याच्या मुळाशी नेमकी हीच मानसिकता असल्याचे अनुभवास येते.

स्थानिक अर्थकारण समृद्ध करण्यासाठीच हे 'बाहेर'चे प्रायः हातभार लावतात असाच जगभरचा (त्यांतही विशेषत्वाने अमेरिकी अर्थव्यवस्थेचा) दाखला आहे. अन्य देशातून वा आपला मायदेश सोडून स्थलांतरण करणाऱ्या या स्थलांतरितांची 'केमिस्ट्री' काही वेगळीच असते. एक तर हे लोक मुळातच हिमकती असतात. जोखीम घेण्याची त्यांची मानसिक तयारी असते. वाटेल त्या प्रसंगात धकून जाण्याचा कणखरपणा असतो. आपल्याबरोबर एक वेगळी कार्यशैली ते घेऊन येतात. केवळ कार्यशैलीच नाही तर, नवा अनुभव, नवीन दृष्टी, नवीन तंत्रज्ञान आणि नवीन सर्जनशीलताही. अनेक देशांतून एका ठिकाणी जमलेल्या या स्थलांतरितांच्या आदानप्रदानामधून परस्परांच्या निर्मितीक्षमतेला पूरक असे उद्यमशील पर्यावरण तयार होते. अनुभवाची जोड लाभलेल्या कौशल्यांचे वैविध्य एकत्र आल्याने एक मोठा 'टॅलेन्ट पूल' त्यातून तयार होतो. वैविध्य ही शोधाची, नवनिर्माणाची जननी असते. वैविध्य आणि 'टॅलेन्ट पूल'च्या साहचर्यातूनच नवशोधनाची मुहूर्तमेढ रोवली जाते. स्थलांतरणाद्वारे देशात आलेले होतकरू स्थलांतरित हे तुलनेने तरु ण असतात.

स्थानिक प्रशासनाला त्यांच्याकडून कररूपाने महसूलही गोळा करता येतो. तसेच, हे लोक वृत्तीनेही लवचीक असतात. कोठेही जाऊन काम करण्याची त्यांची मानसिकता असते. परिणामी, अर्थव्यवस्थेतील एकंदरच मनुष्यबळात व कामकरी वर्गात एक प्रकारची लवचिकता त्यांच्या संपर्काने रुजते. या लवचिकतेचा लाभ साहजिकच स्थानिक उद्योगविश्वाला मिळतो.

या सगळ्याचा परिपाक म्हणजे केवळ उच्च विद्याविभूषित आणि दर्जेदार व्यावसायिक कौशल्ये अंगी असणाऱ्या परदेशी कामगार वा मनुष्यबळालाच ब्रिटनमध्ये प्रवेश दिला जावा, अशी मागणी मध्यंतरी तिथे जोर धरत होती. अमेरिकेसारख्या देशाने स्थलांतरितांच्या उपक्रमशीलता तसेच सर्जनशीलतेचा लाभ उठवत साध्य केलेल्या प्रगतीकडे पाहून एकंदर ब्रिटनमध्येच स्थलांतरितांना होणाऱ्या विरोधाची धार बोथट होण्याच्या प्रक्रियेचाच हा एक पदर. विशेषतः, वैद्यकीय व्यावसायिकांसारख्यांना या बंदीतून वगळण्यात यावे, असा एक सूर तिथे होता. मात्र, केवळ उच्च विद्याविभूषित आणि व्यावसायिक कौशल्ये असणाऱ्यांसाठीच ब्रिटनचे दरवाजे उघडे ठेवावेत अशी मागणी करणाऱ्यांना अकुशल, अर्धकुशल स्थलांतरितांनी ब्रिटिश उद्योगव्यापाराला दिलेल्या योगदानाची तितकीशी कल्पना असत नाही. आजमितीस, वास्तवात परिस्थिती अशी आहे की दर्जेदार व्यावसायिक कौशल्ये अंगी असणाऱ्यांइतकीच अर्धकुशल मनुष्यबळाचीही ब्रिटनला निकड आहे. कशासाठी... तर, ब्रिटनमधील औद्योगिक संकुले कार्यरत राखण्यासाठी ! लंडन हे याचे उत्तम उदाहरण ठरेल. आज लंडन हे खऱ्या अर्थाने जागतिक शहर बनलेले आहे. लंडनमधील एक तृतीयांश नागरिक हे जन्माने ब्रिटनवासी नाहीत. लंडन आणि त्याच्या परिसरातील नानाविध उद्योगांमधील यंत्रांची चाके गरगरताना दिसतात ती त्यांना स्थलांतरितांच्या हातांचा स्पर्श होतो म्हणूनच. आज लंडनमधील उद्यमशीलता भरभराटलेली दिसते ती बाहेरून तिथे आलेल्या कसबी हातांच्या कर्तबगारीवरच. केवळ स्थानिक, लंडनवासी आणि निखळ ब्रिटिश मनुष्यबळावरच विसंबून राहावयाचे असे ब्रिटिश उद्योजकांनी ठरविले तर ते जागतिक स्पर्धेत केव्हाच मागे पडतील. कारण, स्थानिकांसह स्थलांतरित कामगारांचाही विशाल 'टॅलेन्ट पूल' हाताशी असलेले अन्य देशांतील त्यांचे स्पर्धक जागतिक बाजारपेठेत स्पर्धात्मक किंमती आणि मालाची गुणवत्ता यांच्या जोरावर पुढे निघून जातील.

स्थलांतरितांविरुद्ध आघाडी उघडणाऱ्यांच्या तक्रारींचा रोख हा बाहेरच्या लोकांमुळे ब्रिटनच्या आर्थिक तसेच सांस्कृतिक ढाच्यावर होणाऱ्या 'आक्रमणा'वर असतो. अन्य

देशांमधून येणारे हे स्थलांतरित आमच्या नोकऱ्या वा नोकऱ्यांच्या संधी बळकावतात वा पळवितात, नोकरीधंद्याच्या शोधार्थ एकदा शहरात आलेले हे बाहेरचे नागरिक मग अजिबात आपल्या मूळ स्थानी परत जात नाहीत, शहरामधील त्यांच्या वास्तव्यापायी शहरांतर्गत पायाभूत सेवासुविधांवर कमालीचा ताण पडतो, परिणामी, नागरी सेवांचा दर्जा घसरतो, ब्रिटिश संस्कृती व परंपरा यांबाबत अनभिज्ञ असलेले हे स्थलांतरित शुद्ध ब्रिटिश जीवनशैलीवर घाला घालतात या धर्तीचे आक्षेप वारंवार घेतले जातात.

परंतु, त्याच वेळी या बाहेरच्या स्थलांतरितांमुळे ब्रिटिश उद्योग तसेच व्यवसायांच्या क्षेत्राला मिळणाऱ्या नव्या परिमाणांकडे मात्र हे टीकाकार सपशेल दुर्लक्ष करतात, असा प्रतिवाद काही अभ्यासक-संशोधक करतात. उदरनिर्वाहासाठी आलेले हे स्थलांतरित जे नानाविध उद्योगव्यवसाय करतात त्यामुळे ब्रिटिश नागरिकांना उपलब्ध होणाऱ्या वस्तू व सेवांमधील वैविध्य कितीतरी प्रमाणात वाढते. खवैय्या ब्रिटिशांना अन्यथा लज्जतदार व्हिएतनामी पदार्थ कसे मिळाले असते ? शिवाय, या चीजा त्यांना तुलनेने स्वस्त दरात मिळतात, हा भाग तर वेगळाच. बालसंगोपनासारखी सेवा हे याचे उत्तम उदाहरण ठरावे. हे स्थलांतरित कामगार स्थानिक ब्रिटिश कर्मचारी तसेच व्यावसायिकांची उत्पादकता वाढविण्यास पूरक-उपकारक ठरतात, हा त्यांच्या 'कॉन्ट्रिब्यूशन'चा आणखी एक आयाम. स्थलांतरितांच्या ठायी असणाऱ्या कौशल्यांची जोड मिळाल्याने मूळच्या ब्रिटिश व्यावसायिकांची उत्पादकता आणि स्पर्धात्मकताही वाढल्याची अनेक उदाहरणे दाखविता येतात. फिलिपिन्समधून ब्रिटनला स्थलांतरित झालेल्या परिचारिकांमुळे ब्रिटिश वैद्यकीय व्यावसायिकांना पूर्वीपेक्षा कितीतरी अधिक रुग्णांना वैद्यकीय सेवा आता पुरविता येते. स्थानिक ब्रिटिश कामगार-व्यावसायिकांची उत्पादकता वाढल्याने एकंदरच बाजारपेठेचे आकारमान वाढून सर्वसाधारण कल्याणाची पातळी उंचावण्यास हातभार लागतो, असे या संदर्भातील काही अभ्यासांती आढळून आले आहे. स्थलांतरितांना विरोध करणाऱ्यांसमोर ही व अशी उदाहरणे आज आवर्जून ठेवली जात आहेत.

बरें, ब्रिटिश उद्योग-व्यवसायांना केवळ उच्च विद्याविभूषित तंत्रज्ञ वा अभियंते यांचीच जरुरी भासते असेही नाही. मध्यम स्तरावरील व्यवस्थापक, टेलिफोन ऑपरेटर, रिसेप्शनिस्ट, वेटर, सफाई कर्मचारी, टॅक्सीचालक, कुरिअर सेवा अशी नानाविध प्रकारची कामे करण्यासाठी बाहेरून आलेले अल्पशिक्षित, अर्धशिक्षित, अर्धकुशल स्थलांतरित अर्थव्यवस्थेत पदोपदी आवश्यक असतात. वस्तु तसेच सेवांच्या उत्पादनसाखळीत हे कामकरी महत्त्वाची उत्पादक भूमिका बजावत असतात. यांच्या

सेवा अशा विशिष्ट असतात की त्यांचे यांत्रिकीकरणही करता येत नाही. वयोवृद्ध नागरिकांची देखभाल व त्यांना आरोग्यविषयक सेवा पुरविणे, हे याचे आदर्श उदाहरण. अर्थव्यवस्था जसजशी प्रगतीच्या पुढील टप्प्यावर जाते तसतशी अल्पकुशल कामे शक्यतो 'आउटसोर्स' करण्याची व्यावसायिकांमधील मानसिकता वाढीस लागते. या मागे आर्थिक तर्कशास्त्रही आहेच. ज्या कामांमध्ये फारशा व्यावसायिक कौशल्यांची निकड भासत नाही अशी कामे उपलब्ध असणाऱ्या अर्धकुशल वा अकुशल मनुष्यबळाकडून 'आउटसोर्सिंग'द्वारे करून घेतली की उच्च व्यावसायिक कौशल्ये अंगी असणारा व्यावसायिक अधिक उत्पादक स्वरूपाची कामे हाती घेण्यास मोकळा होतो. ब्रिटनमधील 'इन्स्टिट्यूट ऑफ एम्प्लॉयमेन्ट रीसर्च'च्या अंदाजानुसार, अल्पकुशल रोजगार संधींचे एकंदर ब्रिटिश अर्थव्यवस्थेतील प्रमाण, सन २०१२ पर्यंत, जवळपास २५ टक्क्यांपर्यंत वाढेल. स्थानिक देशी कामगारांनी काही प्रकारची कामे करण्यास नकार दर्शविल्यामुळेही स्थलांतरितांवर अवलंबून राहण्याची पाळी उद्योगव्यावसायिकांवर आल्याचीही उदाहरणे ब्रिटनमध्ये आढळतात. काही प्रकारची धोकादायक कामे, सफाईसारखी फारशी सामाजिक पतप्रतिष्ठा नसलेली कामे यांसारख्या रोजगारसंधींचा या गटात समावेश होतो. अशी कामे करण्यास ब्रिटिश कामगार - अगदी अकुशल वा अर्धकुशल ब्रिटिश कामगारही - राजी नसल्याने स्थलांतरितांच्या सेवांवर अवलंबून राहण्याखेरीज ब्रिटिश नागरिक तसेच व्यावसायिकांना अन्य पर्यायच नसल्याचेही काही उदाहरणांमध्ये आढळून आले आहे. स्थलांतरित कामगारांना विरोध होतो की ते सामावून घेतले जातात, हे बऱ्याच वेळा स्थलांतरित कामगार कोणती कामे करतात वा करण्यासाठी उपलब्ध असतात यावरही अवलंबून असल्याचे दिसते.

एकंदरच जागतिक स्तरावरील वाढते स्थलांतरण, हा जागतिकीकरणाचा एक अविभाज्य भाग आहे. वाहतूक तसेच दळणवळणाचे तंत्रज्ञान तसेच साधनांमधील प्रगतीमुळे प्रवासाचा वेग, श्रम आणि खर्च यात बचत घडून आली आहे, येत आहे. आंतरराष्ट्रीय स्थलांतरणाच्या माध्यमातूनच देशादेशांमधील व्यापारास चालनाही मिळताना दिसते. आशिया खंडातून अमेरिकेत स्थलांतरण केलेल्या अभियंत्यांनीच 'सिलिकॉन व्हॅली'मध्ये उद्योग स्थापन केले आणि आज तेच उद्योजक 'आउटसोर्सिंग'द्वारे पुन्हा आशिया खंडातील उद्यमशीलतेचेच सिंचन करताना दिसतात. परिणामी, आगामी काळात या स्थलांतरणाचे निरनिराळे आयाम दृष्टोत्पत्तीस पडतील आणि त्याचबरोबर या प्रक्रियेच्या परिणामांबाबतच्या आकलनातही भर पडेल.

# प्रवास मूल्यांचा....

(पृष्ठ ११ वरून)

विषयांनी प्रवेश केला आहे. लोकशाहीमूल्यांचा विचार करता असे आढळते की अयोग्य वाटणाऱ्या राजकीय निर्णयांविरुद्ध आवाज उठविणाऱ्यांच्या संख्येत हळूहळू वाढ होत आहे. एकंदरीत पाहता, प्रथम आर्थिक विकास मग सांस्कृतिक विकास आणि त्यानंतर लोकशाहीकडे वाटचाल असा मूल्यांचा प्रवास होतो, असे अभ्यासकांना आढळते. म्हणजे,जागतिक पातळीवर विविध देशांमध्ये लोकशाही संस्था बळकट होण्यासाठी मूल्यांचा भविष्यातील प्रवास महत्त्वाची भूमिका बजावेल असे वाटते.

✿✿

## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

## 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर, इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

# ANNOUNCEMENT

## INDIAN SCHOOL OF POLITICAL ECONOMY

is pleased to announce the following scheme recently introduced for subscription of the ***Journal of Indian School of Political Economy (JISPE)*** for the Block Period of Three and Five years at a substantial concession resulting in huge savings (up to 33.3%) to the new as well as existing subscribers as under, provided that the subscription amount is remitted in lump-sum on or before June 30, 2007.

| ***Subscription Category*** | ***Yearly Subscription*** | ***Three Year subscription*** | ***Five Year Subscription*** |
|---|---|---|---|
| *Universities & Institutes* | *Rs. 600/-* | *Rs. 1500* | *Rs. 2000/- Plus ** |
| ***Savings*** | ***Nil*** | ***Rs. 300/-*** | ***Rs. 1000/-*** |
| *Individuals & Colleges* | *Rs. 300/-* | *Rs. 750/-* | *Rs. 1000/-* |
| ***Savings*** | ***Nil*** | ***Rs. 150/-*** | ***Rs. 500/-*** |
| *Savings Per cent* | *Nil* | *16.2%* | *33.3%* |

* Statistical supplement to the special issue of the JISPE on 'Political Parties and Election in Indian States : 1990-2003' comprising 335 pages and costing Rs.325/- absolutely free till stocks last.

**For more details write or email to:**

The Administrative Officer,
Indian School of Political Economy,
'Arthabodh', 968/21-22, Senapati Bapat Road,
Pune 411016

Email : ispe@vsnl.net　　Phone - 25657132
Fax - 25657697　　- 25657210

# जागतिकीकरण आणि चलनवाढ

'जागतिकीकरण' या शब्दाचा उच्चार केल्याखेरीज आजकाल कोणाचाही दिवस उगवत वा मावळत नाही. तसे पाहिले तर 'जागतिकीकरण' या संकल्पनेशी आपल्या देशाचा साक्षात संबंध प्रस्थापित झाला तो जेमतेम दीड दशकापूर्वी. जागतिकीकरणाच्या विश्वव्यापक प्रक्रियेशी भारताची नाळ जोडली जाण्यास खऱ्या अर्थाने प्रारंभ झाला तो १९९१ सालापासून. तरीसुद्धा, दैनंदिन व्यवहारांत घडणाऱ्या कोणत्याही गोष्टीचा संबंध थेट जागतिकीकरणाशी जोडण्याचा एक मजेशीर प्रघात पडत असल्याचे हल्ली बऱ्याच प्रसंगी अनुभवास येते. देशाच्या एकंदरच अर्थव्यवस्थेची १९९१ पासून जी पुनर्रचना सुरू झालेली आहे तिच्या भल्याबुऱ्या परिणामांची चिकित्सा आजवर भरपूर प्रमाणात झाली आहे. आजही ती अव्याहत चालूच आहे. परंतु, जागतिकीकरणासारख्या, सर्व जगालाच आपल्या कवेत घेणाऱ्या वावटळीने देशोदेशीच्या अर्थव्यवस्थांपुढे, त्या अर्थव्यवस्थांचे व्यवस्थापन व नियमन करणाऱ्या संस्थांपुढे, त्या संस्थांच्या धुरिणांपुढे कोणती आव्हाने उभी केली आहेत यांचा ऊहापोह - आणि तोही अशा संस्थांच्या एखाद्या विद्यमान प्रमुखाने केलेला - सर्वसामान्यांच्या कक्षेत तसा क्वचितच येतो. जर्मनीच्या मध्यवर्ती बँकेचे (सेन्ट्रल बँक) अध्यक्ष प्राध्यापक ॲक्सेल वेबर यांनी, जागतिकीकरणाद्वारे देशोदेशीच्या मध्यवर्ती बँकांपुढे उभ्या ठाकत असलेल्या आव्हानांचे केलेले विश्लेषण म्हणूनच उद्बोधक ठरते.

मुळात, 'जागतिकीकरण' या प्रक्रियेची एकमात्र अशी व्याख्याच करता येणार नाही. किंबहुना, जागतिकीकरणाची उत्क्रांती-प्रगती यांचे मोजमाप करू शकेल, असे एक आणि केवळ एकच असे गमक सांगता येणेही अवघडच ठरावे. अगदी थोडक्यात, साररूपाने सांगावयाचे तर जागतिक पातळीवरील श्रमविभागणीची प्रक्रिया म्हणजे जागतिकीकरण, असे म्हणता येईल. देशोदेशीच्या बाजारपेठा परस्परांत गुंफल्या जाणे, हे जागतिकीकरणाचे फलित आणि त्याचे दृश्य स्वरूप आहे. या बाजारपेठा केवळ वस्तू अथवा सेवांच्याच नाही तर जगभरातील श्रमांच्या बाजारपेठाही परस्परावलंबी आणि परस्पराश्रयी बनत आहेत. बाजारपेठांच्या या आंतरसंबंधांची वीण दिवसेंदिवस घट्ट होत आहे. इतकी की जगाच्या एखाद्या कोपऱ्यात असलेल्या एखाद्या देशातील

एखाद्या बाजारपेठेत घडलेल्या एखाद्या बदलाचे, घडामोडीचे पडसाद जगाच्या थेट दुसऱ्या कोपऱ्यात असलेल्या देशाच्या बाजारपेठेतही उमटतात, जाणवतात. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेची गतिमानता दृश्यमान होते ती मुख्यतः तीन माध्यमांतून. जागतिक व्यापाराचे एकंदरच वाढते असणारे प्रमाण व आकारमान हे त्या प्रक्रियेच्या गतिमानतेचे पहिले गमक. गेल्या ३५ वर्षांचा या संदर्भातील अनुभव मोठा बोलका आहे. जगभरात नानाविध वस्तू व सेवांचे जे ठोकळ उत्पादन होते त्या उत्पादन वाढीच्या वेगापेक्षा अधिक वेगाने जागतिक व्यापार गेल्या साडेतीन दशकांत वाढत होता. १९९०च्या दशकात तर जागतिक व्यापार हा जागतिक उत्पादनापेक्षा दुप्पट वेगाने वाढताना दिसला.

यामागे तीन प्रमुख कारणे आहेत. विक्रीयोग्य वस्तू तसेच सेवांच्या प्रमाणात (तसेच संख्येतही) जगभरातच घडून आलेली व येत असलेली वाढ हे झाले त्यामागील पहिले कारण. देशोदेशीच्या कंपन्या तसेच अर्थव्यवस्थांचा परकीय व्यापारातील सहभाग वाढतो आहे. अर्थव्यवस्थांचा वाढता खुलेपणा हे या वाढत्या सहभागाचे इंगित आहे. एखाद्या देशाच्या अर्थव्यवस्थेचा हा खुलेपणा कसा मोजावयाचा..... ? तर, त्या देशाच्या एकंदर आयात-निर्यातीचे त्या देशाच्या ठोकळ देशी उत्पादनाशी असलेल्या प्रमाणावरून जर्मनीची या संदर्भातील आकडेवारी उद्बोधक आहे. जर्मनीच्या आयात-निर्यातीचे जर्मनीच्या ठोकळ देशी उत्पादनाशी असलेले प्रमाण १९९०च्या दशकात ६० टक्क्यांच्या आसपास होते. गेल्या वर्षी, म्हणजे, २००६ साली हेच प्रमाण उंचावून ७५ टक्क्यांवर पोहोचले.

देशोदेशीच्या उत्पादन व्यवस्थांचे व उत्पादन प्रक्रियांचे वाढते आंतरराष्ट्रीयीकरण, हे जागतिकीकरणाच्या गतिमानतेचे दुसरे गमक. उत्पादन प्रक्रियांचे वाढते आंतरराष्ट्रीयीकरण हे दृग्गोचर होते ते जगभरात एकूणच परकीय थेट गुंतवणुकीचे जे वाढते प्रमाण आहे त्याद्वारे. 'अंक्टाड'च्या आकडेवारीनुसार, २००५ साली जगभरातील एकंदर परकीय थेट गुंतवणुकीचे मूल्य १० ट्रिलियन अमेरिकी डॉलरइतके होते (एक ट्रिलियन म्हणजे एकावर १२ शून्ये). या व्यवहारातील संस्थात्मक सहभागही विस्मयचकित करणारा असाच आहे. सुमारे ७७ हजार बहुराष्ट्रीय उपक्रम व त्यांच्या सुमारे ७ लाख ७७ हजार शाखा भांडवलाच्या या स्थलांतरणात तसेच जागतिक चलनवलनात सक्रिय होत्या. या परकीय थेट गुंतवणुकीमध्ये आजवर विकसित देशांच्या आपापसातील परकीय थेट गुंतवणुकीचे प्रमाण तुलनेने नेहमीच अधिक राहिलेले आहे. मात्र, या

व्यवहारांत अलीकडे विकसनशील देशांचाही सहभाग लक्षणीय प्रमाणात वाढत असल्याचे आढळून येते. असे असले तरी, विकसनशील देशांमधील ही परकीय थेट गुंतवणूक आशिया खंडातील काही मोजक्याच देशांमध्ये एकवटलेली दिसते.

परदेशी मालमत्ता तसेच दायित्वांचे (फॉरिन ॲसेट्स ॲन्ड लायबिलिटिज्) देशांतर्गत ठोकळ उत्पादनाशी असलेले गुणोत्तर प्रमाण वाढते राहणे, हे, जगभरातील अर्थव्यवस्थांच्या (मुख्यतः वित्तीय आघाडीवरील) वाढत्या खुलेपणाचे तिसरे लक्षण. जर्मन अर्थव्यवस्थेचे उदाहरण घेतले तर, हे प्रमाण आजमितीस ३४० टक्के एवढे प्रचंड आहे. १९९०च्या तुलनेत या प्रमाणात जवळपास तिपटीने वाढ झालेली दिसते. विकसित देशांच्या गटातही, अन्य अर्थव्यवस्थांच्या तुलनेत, वित्तीय खुलेपणाचे प्रमाण तुलनेने अधिक असलेल्या देशांच्या यादीत जर्मनीची वर्णी लागते. जगभरातील भांडवलाच्या प्रवाहात आढळून येत असलेली सशक्त वाढ ही अन्य अनेक अर्थव्यवस्थांच्या वाढत्या वित्तीय खुलेपणाचे द्योतक मानावयास हवी. विशेषतः, देशादेशांमधील रोखे व्यवहारांचे वाढते प्रमाण, या बाबीची साक्ष देते.

विकसित देशांमध्ये जागतिकीकरणाची प्रक्रिया गेली अनेक दशके उत्क्रांत होत आलेली आहे. परिणामी, सध्या जागतिकीकरणाची चालू असलेली गतिमान प्रगती ही काही तशी फार नवीन, अनोखी, विशेष वा एकमेवाद्वितीय अशी गोष्ट आहे, अशातला भाग मुळीच नाही. किंबहुना, जागतिक पातळीवरील श्रमविभागणीच्या प्रक्रियेद्वारे मिळणारे लाभ पदरात पाडून घेण्यसाठी एकंदर जगभरातच जे प्रयत्न चालु आहेत, त्या प्रयत्नांची ही अतिशय तार्किक आणि नैसर्गिक परिणती आहे, असेच म्हटले पाहिजे. मात्र जागतिकीकरणाचा वेग अलीकडील दशकभरात लक्षणीयरीत्या वाढलेला आहे, ही बाबही तितकीच खरी. दूरसंचार आणि वाहतुकीच्या तंत्रात अप्रतिहत सुधारणा घडून आल्याने या बाबींवरील खर्चातही भरीव बचत झाल्याचे अनुभवास येते. या वास्तवामुळे जागतिकीकरणाचा झपाटा अधिक वेगवान होण्यास हातभारच लागला. यामुळे दोन महत्त्वाच्या गोष्टी घडून आल्या. एक म्हणजे, जगाच्या अनेक भागांतील लोकसमूहांच्या व्यावसायिक कौशल्यांचा दर्जा उंचावण्याबरोबरच एकेकाळी 'अविकसित' वा 'विकसनशील' म्हणून गणल्या गेलेल्या देशांमधील वस्तू तसेच सेवांच्या गुणवत्तेतही चांगलीच सुधारणा घडून आली. त्यामुळे, वैश्विक बाजारपेठेत सक्रिय बनण्याच्या वाटा या देशांसाठी प्रशस्त बनल्या आणि जागतिकीकरणाच्या झपाट्याला भौगोलिक वा प्रादेशिक विस्ताराचे परिमाणही लाभले.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा पायरव आता पूर्वीपेक्षा कितीतरी अधिक भूभागावर, कितीतरी अधिक अर्थव्यवस्थांमध्ये ऐकू येतो, हा याच वास्तवाचा परिपाक. त्यामुळे जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा चेहरामोहराच अलीकडील काळात पार बदलून गेला आहे. एकेकाळच्या बंदिस्त अर्थव्यवस्थांनीही आता जागतिक बाजारपेठेत पाऊल घालण्यासाठी आपले दरवाजे उघडण्यास प्रारंभ केलेला दिसतो. अर्थकारणाच्या वैश्विक पटावरील उभरते मोहरे म्हणून या नवीन पटूंचे महत्त्व वाढत असून 'प्रस्थापित' म्हणून गणल्या गेलेल्या विकसित देशांचे तगडे स्पर्धक या रूपात त्यांची ओळख आता नव्याने स्थिरावू लागली आहे. या सगळ्या घडामोडींचा एक स्वाभाविक परिणाम म्हणजे जागतिक अर्थव्यवस्थेतील सत्तातोल बदलत असल्याचे आता अनुभवास येते. या बदलत्या रचनेत, विशेषत्वाने, चीन व भारत या दोन देशांचे महत्त्व - आर्थिक तसेच राजकीयही - गेल्या दशकभरात वाढलेले दिसते. सत्तातोलातील हा बदल हीदेखील अतिशय नैसर्गिक बाब असून, वैश्विक अर्थकारणाच्या सातत्याने उत्क्रांत होत असलेल्या 'लॅण्डस्केप'चेच ते एक परिमाण आहे.

जगातील सर्वांत मोठा लोकशाही देश म्हणून ओळखला जाणारा भारत, वैश्विक अर्थकारणातील एक उदयोन्मुख आर्थिक सत्ता म्हणून अलीकडे गणला जातो, याबाबत मुळीच संदेह नाही. गेली सुमारे चार वर्षे दरसाल सरासरी आठ टक्के दराने विस्तारणाऱ्या भारतीय अर्थव्यवस्थेने, जगातील सर्वाधिक वेगाने प्रगतिशील असणाऱ्या अर्थव्यवस्थांच्या पंगतीत पान पटकवावे, हे म्हणूनच, स्वाभाविक ठरते. या दमदार आर्थिक प्रगतीच्या काळात, भारतीय अर्थव्यवस्थेतील चलनवाढ ही (त्या मानाने) बरीच आटोक्यात राहिली, ही खरोखरच नोंद घेण्यासारखीच बाब आहे. केवळ इतकेच नाही तर, भारताचा जागतिक व्यापारातील हिस्सा (हळूहळू का होईना परंतु) वाढताना दिसतो, ही गोष्टही तितकीच स्पृहणीय म्हणावयास हवी.

जागतिकीकरणाच्या, आजवर गतिमान राहिलेल्या प्रक्रियेचे भविष्य कसे असेल याबाबत साऱ्यांनाच कुतूहल असणे, हे अनाठायी म्हणता येणार नाही. जागतिक अर्थव्यवस्थेच्या दळदार प्रगतीने जागतिकीकरणाच्या विस्ताराला आवश्यक ते इंधन आजवर पुरविलेले दिसते. वैश्विक अर्थकारणाच्या प्रगतीची ही गती आगामी काळातही कायम राहील (निदान नजिकच्या भविष्यात तरी), असे अनुमान आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने वर्तविले आहे. अगदी अनपेक्षित, अघटित, अकल्पित असे काही घडले नाही तर, सध्या चालू असलेले २००७ हे सालही, जागतिक ठोकळ उत्पादन सरासरीपेक्षा

अधिक वेगाने वाढण्याचे सलग पाचवे वर्ष ठरेल. या सगळ्या गतिशीलतेचे वित्तीय तसेच आर्थिक परिणाम काय होतील आणि त्यांसंदर्भात त्या त्या देशाच्या मध्यवर्ती बँकेची जबाबदारी व भूमिका काय राहते, काय राहावयास हवी, ही मोठी औत्सुक्याची बाब बनते. विशेषतः, जागतिकीकरण आणि एखाद्या देशाचे पैसाविषयक धोरण यांच्यातील आंतरसंबंध हा तर अधिकच कुतूहलाचा प्रांत ठरतो.

अर्थव्यवस्थेतील चलनवाढीवर तसेच अल्पमुदतीच्या कर्जांवरील व्याजदरांवर जागतिकीकरणाचे कोणते परिणाम घडून येतात, ही कोणत्याही देशाच्या मध्यवर्ती बँकेच्या लेखी अतिशय संवेदनशील गोष्ट ठरते. जगभरचा या बाबतीतील अनुभव असे दर्शवितो की जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने गती पकडली आणि सर्वसाधारणपणे चलनवाढीच्या सरासरी दरात घट घडून आली. जागतिकीकरण, वाढता आंतरराष्ट्रीय व्यापार, अधिकाधिक देशांचा जागतिक व्यापारातील सहभाग, त्यामुळे वस्तू व सेवांच्या बाजारपेठेचा घडून आलेला वैश्विक विस्तार, त्यातून जागतिक श्रमविभागणीस मिळालेली चालना, त्यामुळे वाढलेली उत्पादकता, परिणामी वाढलेले उत्पादन, वाहतूक तंत्रातील सुधारणांमुळे वाहतुकीच्या खर्चात तसेच वेळात घडून आलेली घट, त्यामुळे जगभरात सुलभ व वेगवान ठरलेली वस्तूंची देवाणघेवाण, इंटरनेटसारख्या सुविधांमुळे आवाक्यात आलेले सेवांचे हस्तांतरण हा सारा कार्यकारणभाव या मागे असावा, हे तर्कशुद्धच ठरते. परिणामी, जागतिकीकरणामुळे वैश्विक स्तरावरील चलनवाढ आटोक्यात राहिली, असे एक प्रमेय अलीकडील काळात मांडले जाताना दिसते.

हे प्रमेय तसे तर्कशुद्ध असले तरी ते सर्वार्थाने यथार्थ नाही. कारण, नजिकच्या भूतकाळातील पुरावा त्याच्या सार्थतेस पूरक असल्याचे दिसत नाही. आंतरराष्ट्रीय व्यापाराचे ठोकळ देशी उत्पादनाशी वाढते असणारे प्रमाण हे वाढत्या उदारीकरणाचे, विस्तारणाऱ्या आंतरराष्ट्रीयीकरणाचे द्योतक समजले जाते. हे वास्तव १९७० तसेच १९८०च्या दशकातही अनेक विकसित देशांमध्ये दृग्गोचर होते. मात्र, त्या काळात चलनवाढीचा सरासरी दर आजच्यापेक्षा कितीतरी अधिक होता. जागतिकीकरणाची गती चलनवाढीच्या प्रगतीला पायबंद घालत असल्याचे प्रमेय मान्य करावयाचे झाल्यास हाच कार्यकारणभाव त्या काळीही का दिसून आला नाही, हा प्रश्न विचारल्यावाचून सुटका होत नाही. या संदर्भात, मग, आजच्या काळात देशोदेशीच्या मध्यवर्ती बँकांनी वेळोवेळी केलेल्या उपाययोजनांचे महत्त्व मनावर बिंबते. अलीकडील काळात, जागतिकीकरण आणि चलनवाढ या उभय बाबी हातात हात घालून चालताना दिसत

नाहीत वा दिसल्या नाहीत (निदान आजवर तरी) यामागील मुख्य कारण म्हणजे जगभरातील मध्यवर्ती बँकांनी सजगपणे आखलेली व राबविलेली अनुकूल धोरणे. ही बाब नजरेआड करणे ही मोठीच गफलत ठरेल.

विशेषत:, भारत आणि चीन या दोन देशांमध्ये अतिशय वेगाने घडून आलेल्या औद्योगीकरणामुळे या उभय देशांमधील ऊर्जेची गरज व परिणामी मागणी एकदम घसघशीतपणे वाढली. खनिज तेलाच्या जागतिक किमतींमध्ये घडून आलेल्या वाढीस कारणभूत असणाऱ्या अनेकविध घटकांमधील एक मुख्य घटक म्हणून या बाबीचा निर्देश करावा लागेल. तेलाच्या जागतिक बाजारपेठेतच तेलाचे भाव तापल्याने त्याचे पडसाद देशोदेशींच्या अर्थव्यवस्थांमध्येही उमटले. उद्योगांच्या उत्पादन खर्चात वाढ झाल्याने वस्तू तसेच सेवांच्या किमतीही चढू लागल्या (तांत्रिक अर्थशास्त्रीय परिभाषेत या प्रक्रियेस 'कॉस्ट पुश् इन्फ्लेशन' असे संबोधतात). खास करून विकसित देशांमध्ये तर या वास्तवाचे परिणाम नानाविध पातळ्यांवर दिसले. तरीही, त्यामानाने ही चलनवाढ आटोक्यात राहिली असेच म्हणावे लागेल.

किंमतींची पातळी बऱ्यापैकी स्थिर राहण्याकडे दिसून आलेला हा जगभरचा कल हे देशोदेशीच्या मध्यवर्ती बँकांनी त्यासाठी वेळेवर, डोळसपणे केलेल्या परिणामकारक उपाययोजनांचे फल आहे. किंमती आटोक्यात राखण्यासाठी मध्यवर्ती बँकांनी योजलेल्या उपायांना जागतिकीकरणाच्या वेगवान गतीने बळकटी पुरविली हे नि:संशय. मात्र, मुख्यत: पैसाविषयक धोरण आखणीत तसेच त्या धोरणाच्या अंमलबजावणीत मध्यवर्ती बँकांना प्रदान करण्यात आलेल्या स्वायत्ततेचाही तो परिपाक होता, हे या ठिकाणी विसरता येणार नाही. त्यामुळे, देशोदेशीच्या मध्यवर्ती बँकांची स्वायत्तता हा या पुढील काळात अतिशय कळीचा मुद्दा ठरणार आहे. आजवर बंदिस्त असलेल्या अर्थव्यवस्था जेव्हा जागतिकीकरणाच्या प्रवाहांसाठी आपली दारेखिडक्या खुल्या करतात, त्याच वेळी त्या अर्थव्यवस्थांमधील नियामक यंत्रणा या कितपत कार्यक्षम, सक्षम आणि स्वायत्त आहेत यावर जागतिकीकरणाच्या फळाची चव बऱ्याच अंशी अवलंबून राहते, असाच जगभरातील अनुभव आहे.

जागतिकीकरणाबरोबरच भांडवलाच्या वैश्विक स्तरावरील हस्तांतरण, देवाणघेवाण तसेच आदानप्रदानालाही चालना मिळालेली आहे. परिणामी, देशादेशांमधील वित्तीय प्रवाहही वाढताना दिसतात. या आदानप्रदानाचा प्रगाढ प्रभाव देशांतर्गत व्याजदरांवर (मुख्यत: दीर्घ मुदतीच्या कर्जांवरील व्याजदरांवर) पडत असल्याचे अनुभवास येते.

या अशा वातावरणात, देशांतर्गत व्याजदरांवर नियंत्रण ठेवण्यात मध्यवर्ती बँका आणि पर्यायाने पैसाविषयक धोरण कितपत परिणामकारक ठरेल, हाही एक प्रश्न हल्ली वारंवार उपस्थित केला जातो.

वित्तीय प्रवाहांचे मोठ्या प्रमाणावर आंतरराष्ट्रीयीकरण झालेले असल्याने देशोदेशीच्या वित्तीय व्यवस्थांची परस्परांमधील गुंफण ही पूर्वीपेक्षा आज कितीतरी अधिक सघन झालेली आहे. त्यामुळे वित्तीय व्यवहारांतील जोखमीचे प्रमाण एकंदरच वाढलेले अनुभवास येते. त्यातच, वैश्विक अर्थव्यवस्थेत पोसल्या जात असलेल्या एका असमतोलाने या जोखमीची तीव्रता अधिक जाणवते. अमेरिकेच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराचा लेखाजोखा तपासला तर आंतरराष्ट्रीय व्यापारात अमेरिकेला गेली काही वर्षे चालू खात्यावर सातत्याने तूट येत असल्याचे दिसते. एका परीने, जागतिकीकरणाच्या प्रक्रियेद्वारे जागतिक स्तरावर जी श्रमविभागणी अलीकडील काही वर्षांत घडून आली आहे, तिचा हा परिपाक आहे. एकंदरच वैश्विक उत्पादन व्यवस्थेचे केंद्र आशिया खंडाकडे सरकत आहे. परिणामी, वस्तू तसेच सेवांच्या जागतिक पुरवठ्यात या खंडातील देशांचा सहभाग वाढतो आहे. या देशांचा जागतिक व्यापारातील सहभागही अलीकडील दोन दशकांत सातत्याने उंचावताना दिसतो. परिणामी, या देशांकडील परकीय चलनाची गंगाजळी दिवसेंदिवस बाळसेदार होत आहे. जागतिक स्तरावरील असमतोलाचे स्वरूप हे आहे.

परकीय चलनाच्या या (अतिरिक्त) पुंजीचे करावयाचे तरी काय, याबाबत या देशांमध्ये सध्या सतत मंथन चालू आहे. परकीय चलनाच्या साठ्यापैकी काही हिस्सा अर्थव्यवस्थेमध्ये गुंतविण्याचा पर्याय निश्चितच खुला आहे. मात्र त्यामुळे अर्थव्यवस्थेतील पैशाचा पुरवठा आणि पर्यायाने अर्थव्यवस्थेतील सर्वसाधारण किंमत पातळी यांवर जे परिणाम संभवतात त्यांचा विचार करता तो पर्याय खुला असला तरी त्याचा अंगीकार करण्याबाबत त्या देशांमधील सरकारे व मध्यवर्ती बँका 'आस्ते चलो'चेच धोरण राबवित असल्याचे दिसते. जागतिक अर्थकारणातील उपरोक्त असमतोलाचीच ही सारी रूपे वा परिमाणे आहेत. देशोदेशीच्या अर्थव्यवस्थांमधील चलनवाढ, व्याज दर यांचे व्यवस्थापन या साऱ्या पार्श्वभूमीवर करणे, हेच जगभरातील सर्व मध्यवर्ती बँकांसमोरील मुख्य आव्हान आहे. आपल्या स्वायत्ततेची जपणूक करत असतानाच पैसाविषयक धोरणाची अंमलबजावणी प्रगल्भपणे करण्यात मध्यवर्ती बँकांची कसोटी लागणार आहे. ✿✿

(पृष्ठ ३ वरून)
'स्पर्धा' हे केंद्रवर्ती मूल्य मानणाऱ्या खुल्या बाजारपेठीय व्यवस्थेला अंमळ वाव मिळाला आणि या मूल्यात्मक बदलाने भारतीय अर्थकारणाच्या तेथवरील वाटचालीत एक महत्त्वपूर्ण स्थित्यंतर घडवून आणले, अशीही एक भूमिका मांडली गेलेली आहे. १९९१ सालापासून आर्थिक पुनर्रचना आणि उदारीकरणाचे पर्व देशात सुरू झाले आणि स्पर्धेवर आधारित खुल्या बाजारपेठीय अर्थमूल्यांना जणू अग्रपूजेचा मानच मिळाला. स्पर्धेद्वारे श्रमविभागणीच्या तत्त्वाला चालना मिळते, श्रमविभागणीमुळे विविध आर्थिक घटकांची उत्पादकता वाढते, परिणामी एकंदर उत्पादन व उत्पन्न वाढीचे मार्ग प्रशस्त बनतात, त्यामुळे बाजारपेठेचा विस्तार होतो आणि या प्रगतीचे लाभ एकूणच समाजाला मिळतात हे यामागील तर्कशास्त्र. आर्थिक विकासाची परिणती स्वातंत्र्याच्या विस्तारात होते, निदान तशी अपेक्षा तरी असते. आर्थिक विकास गतिमान बनला की एकूणच वस्तू व सेवांचे उत्पादन आणि पर्यायाने बाजारपेठेतील त्यांची उपलब्धता वाढते. वस्तू व सेवांच्या वैविध्यात भर पडली की आपोआपच ग्राहकाला निवड करण्यास अधिक वाव मिळतो. म्हणजेच, ग्राहकाच्या निवडस्वातंत्र्याच्या कक्षा विस्तारतात. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही मूल्यत्रयी म्हणजे तर लोकशाहीचा गाभा. यातूनच आर्थिक विकास, त्यातही विशेषत्वाने खुल्या बाजारपेठीय तत्त्वांनुसार गतिशील होणारा आर्थिक विकास आणि जनसामान्यांच्या आशाआकांक्षांच्या मुक्त प्रगटीकरणास अवकाश पुरविणारी लोकशाही राज्यप्रणाली यांचा अनुबंध जोडणारी तार्किक विचारप्रणाली प्रस्थापित होताना दिसते. लोकशाही मूल्यांवर विश्वास असणारी राज्यप्रणाली ही आर्थिक विकासाच्या प्रक्रियेस तुलनेने अधिक पूरक ठरत असल्याचे मत जागतिक बँकेसारख्या संस्थाही व्यक्त करताना दिसतात. परंतु, हे चित्रही निरपवाद असल्याचा अनुभव नाही. कारण, घडून येणारा हा विकास जर सर्वसमावेशक नसेल तर त्यातून समतेच्या मूल्याला छेद जातो. निखळ बाजारपेठीय निकषांनुसार गतिमान होणाऱ्या विकासाच्या गंगेत डुबकी मारण्यासाठी आवश्यक अशा क्रयशक्तीची पुंजी विविध समाजघटकांच्या गाठीशी असणे अनिवार्य ठरते. ती पुंजी जर नसेल तर विकासाची गंगा दारावरून वाहते पण तिच्या

प्रवाहात हात मात्र बुडविता येत नाही, अशी उपेक्षा क्रयशक्तीला पारख्या झालेल्या समाजघटकांच्या पदरी येते. विशेषतः, उत्पन्न आणि मालमत्तेच्या वाटपात कमालीची विषमता असणाऱ्या समाजव्यवस्थांत तर ही समस्या अधिकच प्रकर्षाने अनुभवास येते. परिणामी, वेगवान आर्थिक विकासामुळे निवडस्वातंत्र्याचा परीघ विस्तारलेला असला तरी निवडसंधींचे वाटप मात्र समतेच्या तत्वाला हरताळ फासणारे ठरते. यातून अशा समाजव्यवस्थांत असंतोष खदखदू लागतो आणि अंती बंधुतेच्या तत्वालाही सुरुं ग लागतो. म्हणून, विकासाची प्रक्रिया ही केवळ गतिमान बनून भागत नाही, तर, ती पुरेशी बळकट आणि तितकीच सर्वसमावेशकही असणे अगत्याचे ठरते. या साठी, आर्थिक विकास नेटाने पुढे रेटण्यास आवश्यक असणारी राजकीय इच्छाशक्ती पुरेशी खंबीर असणे आवश्यक असते. इथे, समाजातील राजकीय व्यवस्था कोणत्या प्रकारची आहे, ही बाब कळीची ठरते. लोकशाही मूल्यांवर आधारलेल्या राजकीय व्यवस्थेत राजकीय इच्छाशक्ती दरवेळीच तितकी प्रबळ आणि खंबीर राहील याची शाश्वती नसते. कारण, आपला जनाधार पातळ करणारे धोरणात्मक निर्णय निखळ अर्थशास्त्रीय निकषांच्या सहाणेवर घासून घेणे हे राजकीय नेतृत्त्वाला व्यावहारिकदृष्ट्या परवडणारे नसते. यातूनच मग आर्थिक विकास वा पुनर्रचनेच्या गाड्याची गती मंदावते. चीन आणि भारत या दोन देशांच्या आर्थिक चित्रांची तुलना करताना हा मुद्दा वारंवार मांडला जातो. इथे पुन्हा प्रश्न उभा ठाकतो तो मूल्यांचा. जनमताला विशेष अवकाश नसणारी परंतु सातत्यशील आणि वेगवान आर्थिक विकासाची हमी देणारी व्यवस्था एकीकडे आणि लोकमताचा आदर राखत परंतु रखडत-थबकत गतिमान होणारी आर्थिक प्रगती दुसरीकडे यांपैकी कोणता पर्याय अधिक श्रेयस्कर, हा तो मूल्यसंघर्ष. अशा विविध संघर्षांमधूनच जगभरच्या मूल्यप्रणाली आजमितीस संक्रमण करीत आहेत. परिणामी, बदलत्या काळाशी सुसंगत अशी मूल्यप्रणाली जोपासण्याची साधना आपल्या सगळ्यांनाच करावी लागणार आहे. मूल्यांच्या आजवरच्या प्रवासाची यापुढील काळातील दिशा कशी असेल, हा म्हणूनच एक कुतूहलाचा प्रश्न ठरतो. या प्रश्नाचा मागोवा घेण्याचा प्रयत्न करणारा 'अर्थबोधपत्रिके'च्या या अंकातील मजकूर विचारांना चालना देईल असा विश्वास वाटतो. ✿✿

# पुनर्प्रक्रियेतून साकारलेले स्वयंपाकघर

'कचऱ्यातून कला' ही काही नवीन बाब नाही. विशेषतः पर्यावरणाशी मैत्री करण्याच्या या काळात तर अशी कला ही आवश्यक ठरू लागली आहे. पर्यावरणप्रेमी नागरिक हौसेने अशी कला निर्माण करतात, जोपासतात. ब्रिटनमधील पर्यावरणप्रेमी ज्युलियन व जॅन रिचर्ड्स् यांनी गेल्या दोन वर्षांच्या प्रयत्नांनंतर विविध टाकाऊ गोष्टींपासून संपूर्ण स्वयंपाकघराची निर्मिती केली आहे. फळांच्या टोपल्या, मशीनमधून मिळणाऱ्या चहा-कॉफीसाठी वापरण्यात आलेले कप, योगर्ट व इतर पदार्थ विकण्यासाठी वापरण्यात आलेले डबे, जुन्या बशा इत्यादी अनेक प्रकारच्या टाकाऊ वस्तूंवर पुनर्प्रक्रिया करून त्यापासून तयार केलेल्या आणि आधुनिक काळाला शोभेल अशा या छानशा स्वयंपाकघराला KORC - Kitchen of Recycled Content हे 'ब्रँडनेम' देण्यात आले आहे. यातील कपाटे व इतर सामानांचा दर्जाही चांगला ठेवण्यात आला आहे. पुनर्प्रक्रिया करता येईल अशा वस्तू वापरण्याचे आवाहन नागरिकांना सतत केले जात असते. मात्र ही प्रक्रिया केल्यानंतर त्या सामग्रीचा नेमका काय उपयोग करता येईल, असा प्रश्न स्वाभाविकपणे निर्माण झाला. तेव्हा रिचर्ड्स् यांना स्वयंपाकघराच्या निर्मितीची कल्पना सुचली. कचऱ्यातून निर्माण केलेल्या कलेची ही प्रत्यक्ष कृती लोकांना दाखविल्यानंतर पुनर्प्रक्रिया करता येणाऱ्या, अधिक वस्तू वापरण्याचे आवाहन त्यांना करता येईल, असा त्यांचा आशावाद आहे. त्यामुळे अशा आणखी स्वयंपाकघरांच्या निर्मितीला चालना मिळेल आणि दैनंदिन जीवन पर्यावरणाशी मैत्री करणारे ठरेल, असे त्यांनी म्हटले आहे.

# स्वयंपूर्ण खेड्याकडे....

एका खेड्यातील सर्व व्यवहार सौरऊर्जेद्वारे घडावेत व संपूर्ण जगासाठी एक 'आदर्श' असे स्वयंपूर्ण खेडे साकारावे, यासाठी पोर्तुगलमध्ये जोरदार प्रयत्न करण्यात येत आहेत. स्थानिक लघुउद्योगांकडून सौरऊर्जेची निर्मिती व्हावी, स्थानिक परिसरात जी साधनसामग्री उपलब्ध असेल त्यातूनच घरे बांधण्यात यावीत, सभोवतालच्या पर्यावरणाचा विचार करून पौष्टिक अशा अन्नधान्याचे उत्पादन तेथेच व्हावे, अशी ही आदर्श योजना आहे. यासाठी मॉन्त्सेरो येथे तमेरा युनिव्हर्सिटीची स्थापना गेल्यावर्षी करण्यात आली आहे. येत्या तीन वर्षांसाठी जगभरातील किमान २०० संशोधक या

संशोधनकार्यात सहभागी होतील, असा या विद्यापीठाचा प्रयत्न आहे. अहिंसा, शांतता आणि सहकार्य या त्रिसूत्रीचा विचार करून सातत्यपूर्णता ही या खेड्याची मध्यवर्ती संकल्पना असावी, असे म्हणण्यात आले आहे. विविध धर्मांशी संबंधित असलेल्या व्यक्तींना सर्व धर्मांमधून माणुसकीचे धडे देणारे आध्यात्मिक ज्ञान मिळावे किंवा तेथे कोणत्याच धर्माचे अस्तित्व नसावे, अशीही कल्पना आहे. सातत्यपूर्णतेच्या संकल्पनेसाठी कोठेही संघर्ष नसावा, हे मूल्य जपले जाणे गरजेचे ठरणार आहे. कोणत्याही प्रकारचा संघर्ष निर्माण होऊच नये आणि जर झाला तर परस्परविश्वास आणि संवादी भूमिका घेऊन तो लवकरात लवकर संपुष्टात आणला जावा, याला येथे महत्त्व देण्यात येणार आहे. तमेरा युनिव्हर्सिटीच्या अभ्यासक्रमात या सर्व बाबींचा समावेश करण्यात आला आहे. पॉल जिसलेर आणि त्यांचे सहकारी ही या प्रयोगातील एक टीम असून अन्न शिजविणे, पाण्याचा पंप चालणे, धान्य दळले जाणे इत्यादी कामे सौरऊर्जेवर करता येतील अशी यंत्रणा आणि किमान ५० नागरिकांसाठी पुरू शकेल एवढी वीज निर्माण करण्यात त्यांना यश आले आहे. असे खेडे विकसित करण्यासाठीची जागा निश्चित करण्यात आली आहे. स्थानिकांची परवानगी व इतर बाबींची पूर्तता करण्याबरोबरच पहिली १० हजार झाडे तेथे लावण्यात आली आहेत. सूर्याच्या अल्ट्राव्हायोलेट किरणांचा अनिष्ट परिणाम जाणवू नयेत यासाठी विशिष्ट थर असलेले ग्रीनहाऊस, सनफ्लॉवर लेन्स यंत्रणा, वीजनिर्मितीसाठी स्टर्लिंग इंजिन, ऊर्जेचा साठा करण्यासाठीची यंत्रणा असे सर्व काही साकारण्याचा जिसलेर टीमचा प्रयत्न आहे. या दरम्यान प्रयोगादाखल काही घरेही बांधण्यात आली आहेत. पर्यावरणाचे संतुलन राखणारे व स्वयंपूर्ण खेड्याकडे जाणारे हे पाऊल प्रेरणादायी ठरावे.

## शाळेतच करा, पर्यावरणाशी मैत्री!

पर्यावरणीय प्रश्नांचा विशेष अभ्यास करणारी एक शाळा अलीकडेच ब्रिटनमध्ये लिव्हरपूल येथे चालू झाली आहे. तेथील ११ व १२ वर्षे वयाच्या मुलांच्या प्रत्येक वर्गासाठी कमी क्षेत्रफळाचे विशेष बगीचे उपलब्ध करून देण्यात आले आहेत. भूगोलासाठी मातीचा अभ्यास, परिसरविज्ञानासाठी झाडांचा अभ्यास आणि बागकामाचा खर्च गणिताच्या अभ्यासासाठीही उपयुक्त ठरणार आहे. यासाठी त्यांना निधीही मिळणार आहे. शाळेतील विद्यार्थ्यांना शाळेतच सौरऊर्जा निर्मितीची व वापरण्याची सोय आहे. पर्यावरणाशी मैत्री शिकविणारी ही शाळा विद्यार्थ्यांना आवडेल व तिला चांगला प्रतिसाद मिळेल, असा विश्वास शाळेच्या संयोजकांना वाटतो. ✿✿

सिंहावलोकन

# 'अर्थबोधपत्रिके'चे अंतरंग

## (१ एप्रिल २००६ ते ३१ मार्च २००७)

जागतिकीकरणाच्या व माहितीच्या या युगात जगभर भ्रमंती करावी, अनेकानेक विषय आपल्या वाचनकक्षेत आणावे आणि आपले विचारविश्व व्यापक करावे, या उद्दिष्टाने १९९८ साली सुरू झालेल्या 'अर्थबोधपत्रिके'चा सहावा खंड एप्रिल २००७च्या या अंकापासून सुरू झालेला आहे. पाचव्या खंडात अंतर्भाव असलेल्या १२ अंकांमधून वाचकांना सादर केलेल्या वाचन-वानवळ्याचा हा आलेख. 'अर्थबोधपत्रिके'च्या पूर्वीच्या खंडांच्या तुलनेत प्रत्येक नवीन खंडाचे अंतरंग कसे दिसते, याचा तुलनात्मक आढावा आणि समीक्षा करण्यास हा मागोवा जसा लेखक-संपादकांना मार्गदर्शक ठरतो, त्याचप्रमाणे गेल्या वर्षभरातील १२ अंकांमधून आपण नेमके वाचले तरी काय काय आणि किती, याचाही लेखाजोखा वाचकांना मांडता यावा याचसाठी हा उपक्रम.

**(१) प्रकाशित साहित्य** : अंकांतील लेख, पुरवणी लेख, विशेष लेखांसह एकूण ६० लेख. 'जिकडे-तिकडे' या सदरांतर्गत स्फुटे - १३. 'काल'चे 'आज'साठी या सदरांतर्गत सादर केलेला मजकूर. अमेरिका, ब्रिटनसह स्वीडन, नॉर्वे व युरोपीय समुदायातील अन्य देश, इस्त्रायल, रशिया, युक्रेन, बेनिन (आफ्रिका), चीन, जपान, भारत, मलेशिया, थायलंड यांसारख्या जगभरातील १५ देशांमधून फेरफटका. **वाचकांनी पाठविलेल्या एकूण २३ पत्रांना प्रसिद्धी.**

**(२) संदर्भ साहित्य** : देशी-विदेशी अशी एकंदर २० नियतकालिके - फ्री इन्क्वायरी, फॉरिन पॉलिसी, एजिंग अँड सोसायटी, इलेक्ट्रॉनिक्स फॉर यू, नॅशनल जिऑग्राफिक, पीस मॅगेझिन, बी.बी.सी. वाइल्डलाइफ, नेचर, करन्ट हिस्टरि, इंटरनॅशनल अफेअर्स, इकॉनॉमिस्ट, फार ईस्टर्न इकॉनॉमिक रीव्ह्यू, जपान-एको, इकॉलॉजिस्ट, धर्म वर्ल्ड, न्यू सायन्टिस्ट, इकॉनॉमिक अ‍ॅन्ड पोलिटिकल वीकली, न्यू स्टेटस्मन, हिस्टरि टूडे, जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी -लेखनासाठी आधारभूत साहित्य म्हणून . याशिवाय, इंटरनेटवरून मिळवलेली माहिती, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीमध्ये वेळोवेळी आयोजित केली जाणारी चर्चासत्रे, 'इकॉनॉमिक टाइम्स', 'हिंदू' यांसारखी

*(पृष्ठ ४० वर)*

# लेखांचे विषयवार वर्गीकरण

| अ.क्र. | विभाग | लेख संख्या | लेखगत विषय |
|---|---|---|---|
| १ | सामाजिक | १२ | •ग्रामीण चीन •'ब्रेनड्रेन' •अफर्मेटिव्ह ॲक्शन •जपानी लोकसंख्या •चिनी मध्यमवर्ग •वृद्धत्वाची समस्या •शहरी वृद्धत्व •डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटीची शताब्दी •रोजगार •सामूहिक ज्ञानाच्या संधी •विकीपीडिया |
| २ | औद्योगिक | ८ | •कामगार सुधारणा • कामगार व प्रशिक्षण •बांधिलकीचा उद्योग (सीएसआर - कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी) |
| ३ | आर्थिक | १० | •राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना • बदलता भारत •विकसनशील देशांचा आर्थिक विकास • विशेष आर्थिक क्षेत्रे (सेझ) |
| ४ | विज्ञान/ संशोधन | ६ | •ई -नाक •मेंदू संशोधन •जनुके व बुद्धिमत्ता •अणुऊर्जा •माणसाची उत्क्रांती •क्लोनिंग |
| ५ | तंत्रज्ञान | ३ | •यंत्रमानव • जैवतंत्रज्ञान •नवतंत्रज्ञानाच्या दिशा •स्मार्ट डस्ट |
| ६ | पर्यावरण | ३ | •खनिज तेलसाठे • कोसळणारा समाज •अणुभट्ट्यांचे दुष्परिणाम |
| ७ | सांस्कृतिक | ५ | •सेक्युलॅरिझम • उत्सव प्रकाशाचा |
| ८ | नागरीकरण | ३ | •जगभरातील नागरीकरण •शहरीकरणातील असमतोल • लहान शहरांचे प्रश्न |

## लेखांचे विषयवार वर्गीकरण

| अ.क्र. | विभाग | लेख संख्या | लेखगत विषय |
|---|---|---|---|
| ९ | राजकीय | ५ | •नेपाळमधील पेच • रशिया व तेल •अमेरिकेचे अण्वस्त्रधोरण •चीनची सॉफ्टपॉवर •चीनची तेलाची मागणी |
| १० | आरोग्य | १ | • संसर्गजन्य रोग |
| ११ | धर्म व समाज | ३ | •इज्तिहाद • चीनमधील ख्रिश्चन धर्म |
| १२ | पुरवणी | १ | दृष्टीआडची अमेरिका |
| | **सदरे** | | |
| • | परिचय | ११ | एप्रिल २००६ ते फेब्रुवारी २००७ |
| • | जिकडेतिकडे | १३ | एप्रिल २००५ ते फेब्रुवारी २००७ |
| • | 'काल'चे 'आज'साठी | १२ | ऑक्टोबर २००४ ते मार्च २००७<br>•ग्रामगीता -नोव्हेंबर २००५ ते मार्च २००७ |

*(पृष्ठ ३८ वरून)*
दैनिके तसेच संस्थेच्या ग्रंथालयात उपलब्ध असणारे समृद्ध कोशवाङ्मय, विविध ग्रंथ, विविध अहवाल यांद्वारा संकलित केलेल्या माहितीचाही लेखनास आधार.

**(३) सदर लेखन** : 'जिकडेतिकडे' हे सदर एप्रिल २००५ पासुन सूरू आहे. तर, 'काल'चे 'आज'साठी हे सदर त्याही पूर्वीपासून, म्हणजे, ऑक्टोबर २००४पासून सुरू झाले होते. पाचव्या खंडात 'परिचय' या एका नवीन सदराचा आपण प्रयोग करून

## प्रमुख संदर्भ

(१) मराठी तत्त्वज्ञान महाकोश, द्वितीय खंड, पृष्ठ ४६६ ते ४७४, प्रकाशक - मराठी तत्त्वज्ञान महाकोश मंडळ, पुणे (2) JapanEcho - Feb-2007 (3) Appropriate Technology- Volume 33, No 4 (4) Resurgence-Jan-Feb 2007 (5) www. theacademy-sfa.co (6) www.mile-stone.uk (7) Global Miration and The World Economy - Two Centuries of Policy and Performance - Timothy J. Hatton, Jeffrey G. Williamson - The MIT Press Massachusetts-2005 (8) Migration at Work - Management Today - February 2007 (9) Challenges posed by (financial) globalisation - Professor Axel A. Weber, President of Deutsche Bundesbank - Lecture given at the University of Pune, Thrusday, March 15, 2007.

---

पाहिला. जागतिकीकरणाच्या आर्थिक परिणामांप्रमाणेच अनेक नवनवीन भाषिक, सामाजिक तसेच सांस्कृतिक परिणामही आपल्या समाजात घडून येत असल्याचे दिसते. याच प्रक्रियेचे एक परिमाण म्हणजे, अनेक नवनवीन शब्द वा संकल्पना अलीकडे आपल्या कानावर पडू लागल्या आहेत. त्यापैकी बऱ्याच संज्ञा-संकल्पना-शब्द आपणही बोलताना वापरतो. काही शब्द दृकश्राव्य माध्यमांद्वारे कानांवर आदळतात, काही संकल्पना विविध चर्चा-परिसंवादांमधून सर्रास योजल्या जातात. क्रीडा, व्यापार, उद्योग, फॅशन, आरोग्य, आंतरराष्ट्रीय व्यवहार यांसारख्या विषयांना वाहिलेल्या नियतकालिकांमधूनही काही नवीनच संकल्पना एकदम आपल्या समोर येतात. वाचनाच्या वा कार्यक्रम बघण्या-ऐकण्याच्या भरात आपण ते शब्द वा संज्ञा केवळ ऐकतो. त्यांचा संपूर्ण अर्थ, त्या अर्थाचे पदर-आडपदर आपल्याला समग्रतेने उमगतातच असेही नाही. अशा काही संज्ञा-संकल्पनांचा, प्रत्येक अंकात एक याप्रमाणे, परिचय घडविण्याचा उपक्रम या सदराच्या माध्यमातून करण्यात आला. पाचव्या खंडाच्या अखेरीस 'परिचय' या सदरास आपण विराम देत आहोत. या सदराच्या यशापयशाचे तसेच उपयुक्ततेचे मूल्यांकन अर्थातच वाचकांनीच करावयाचे आहे. 'परिचय' या सदराप्रमाणेच, 'काल'चे 'आज'साठी या सदरासही आपण पाचव्या खंडाच्या अंतापासून निरोप देत आहोत. हे सदर, त्यामानाने, प्रदीर्घ काळ चालले. अनेकांना ते आवडले तर, काहींनी 'अर्थबोधपत्रिके'सारख्या गंभीर प्रकृतीच्या नियतकालिकात हे सदर अस्थानी वाटते असाही अभिप्राय कळविला. मात्र, अनुकूल मत देणारे वाचक बहुसंख्य असल्याने हे सदर चालू ठेवण्याचा हुरूप टिकून राहिला. ✿✿

## भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीचे नवे प्रकाशन

आपल्या दैनंदिन जीवनावर प्रभाव पाडणाऱ्या क्रांतिकारी मेंदूसंशोधनावरील आकर्षक, सचित्र व संग्राह्य ग्रंथ

# कर्ता-करविता

### आधुनिक मेंदूसंशोधन व आपले जीवन

**मराठी भाषेला अभिमान वाटावा असे पुस्तक - डॉ. ह. वि. सरदेसाई**

● मेंदूसंशोधन ही एक क्रांतीच! मानवी जीवनाला अधिक उच्च टप्प्यावर नेणारी ऐतिहासिक घटना! या क्रांतीचा आलेख रेखाटणारा ग्रंथ.

पृष्ठे २४२ किंमत ३५०/-रु पये

**ग्रंथ घेणाऱ्यांना अर्थबोधपत्रिका मासिक एक वर्ष विनामूल्य**

## अर्थबोधपत्रिका वर्गणीदारांसाठी विशेष योजना

(१ जून २००६ पासून)

वार्षिक वर्गणी फक्त १०० / - रुपये

द्वैवार्षिक वर्गणी फक्त १८० / - रुपये व 'अर्थबोधपत्रिके'चा मेंदूसंशोधन विशेषांक भेट

त्रैवार्षिक वर्गणी फक्त २६० / - रुपये व एक पुस्तिका भेट

पंचवार्षिक वर्गणी फक्त ४०० /- रुपये व दोन पुस्तिका भेट

**पुस्तिका -** (१) भारतातील लोकसंख्यावाढीचा प्रश्न : लेखिका - कुमुदिनी दांडेकर (किंमत ३०/- रुपये) (२) सक्तीचे प्राथमिक शिक्षण : (इंग्रजी व मराठी) लेखक - जयकुमार अनगोळ (दोन्हीची किंमत ३०/-रुपये प्रत्येकी) (४) शोध घेते ते शिक्षण : लेखक प्रा. रमेश पानसे (किंमत ५०/-रुपये) (५) मेंदूसंशोधन विशेषांक ( किंमत ४०/-रुपये)

# ग्रंथालयातील नवी पुस्तके

**Social Banking - Promise, Performance and Potential, by Dr. Deepali Joshi; Published by Foundation Books; 2006, pp. 185; Price : Rs. 425/-**

दारिद्र्य हा भारतातील चिरंतन चिंतेचा आणि चिंतनाचा विषय. तीस कोटींपेक्षा जास्त लोक अजूनही दारिद्र्यरेषेच्या खाली आहेत, ही वस्तुस्थिती आहे. यातील बहुतांश लोक ग्रामीण भागातील आणि शेती-व्यवसायाशी संबंधित आहेत. ग्रामीण भागातल्या लोकांची आणि विशेषतः शेतकऱ्यांची, दारिद्र्याच्या विळख्यातून सुटका करण्याचे प्रयत्न गेल्या काही दशकांपासून वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये चालू आहेत. बँकिंग हे त्यातीलच एक. सहकारी बँका, व्यापारी बँका आणि प्रादेशिक ग्रामीण बँका - अशा सर्वच बँकांच्या, दारिद्र्यनिवारण्याच्या मोहिमेसंदर्भातील कामाचा आढावा घेणे यादृष्टीने संयुक्तिक आहे. प्रस्तुत पुस्तकात लेखिकेने नेमके हेच केले आहे. सहकारी संस्थांनी ग्रामीण भागात पतपुरवठा करण्यासंबंधी सुरुवातीला दिलेली आश्वासने आणि त्यांची प्रत्यक्ष कामगिरी; राज्य आणि मध्यवर्ती अशा दोन्ही पातळ्यांवरून त्यांचे होणारे नियंत्रण आणि अशा नियंत्रणाचा त्यांच्या कार्यावर व कामगिरीवर होणारा प्रतिकूल परिणाम; त्यांचे यश, अनेक वित्तीय संस्था असूनही, सहकारी संस्थांची दारिद्र्य कमी करण्याच्या बाबतीतील अनिवार्यता असा सहकारी संस्थांचा सखोल अभ्यास यात आहे. सहकारी संस्थांप्रमाणेच व्यापारी बँकांवर १९६९च्या राष्ट्रीयीकरणानंतर टाकलेली ग्रामीण वित्तपुरविठ्याची जबाबदारी, त्या संदर्भात त्यांना असलेल्या संधी, राष्ट्रीयीकरणाच्या नंतरच्या काळातील त्यांची प्रगती; ग्रामीण भागात वित्तपुरवठा करताना त्यांच्याकडून झालेला प्रादेशिक भेद, त्यांच्यातील काही अंगीभूत उणीवा हाही भाग वाचनीय आहे. सहकारी संस्थांचे सशक्तीकरण आणि खासगी व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण होऊ नही ग्रामीण भागाच्या पतविषयक गरजा अतृप्तच राहिल्या. यावर उपाय म्हणून प्रादेशिक ग्रामीण बँकांची स्थापना १९७६ मध्ये झाली. काळाच्या ओघात या बँकांसमोर उभ्या ठाकलेल्या समस्या, त्या समस्यांचे निराकरण व त्यांना मिळालेले यश, यांबरोबरच 'मायक्रोफिनान्स' या विषयावरील दोन प्रकरणेही या ग्रंथात आहेत. रिझर्व्ह बँकेत वरिष्ठ पदावर असणाऱ्या लेखिकेला बँकिंग क्षेत्रातला अनुभव मोठा आहे आणि त्याचे पुरेसे प्रतिबिंब या पुस्तकात उमटले आहे. ■■

RNI, Regn.No. MAHMAR/2002/9806
Declaration Ref. P.H.M./S.R./180/VIII/2005
Postal Regn.No.: L-2/RNP/PNW/M 125/2007-2009
LICENCE NO. LWP-228
Posted at Market Yard P.S.O. on 10th of each month

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■ 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■ भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■ अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग - व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■ इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/ पुस्तिका योग्य नमुन्यात प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■ संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक( 'जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ) चालवले जाते. ■ संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात. ■ अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणाऱ्या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

**- संस्थेचे नियंत्रण मंडळ -**

•अजित कर्णिक •विकास चित्रे •कुमुदिनी दांडेकर
•ललित देशपांडे •द.ना. धनागरे •आनंद नाडकर्णी •सुहास पळशीकर
•रमेश पानसे •मनोहर भिडे •योगेंद्र यादव •नीळकंठ रथ
•व्ही.एम्.राव •ए.वैद्यनाथन •रामदास होनावर

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक रामदास होनावर यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**